अंकुश शिंगाडे

# पुरस्कार



## या मित्रांनो! सुंदर पुस्तकांचा मनमुराद आनंद लुटा!!

# पुरस्कार

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

## पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# पुरस्कार

(कादंबरी)

अंकुश शिंगाडे

ई साहित्य प्रतिष्ठान

# पुरस्कार

लेखक : अंकुश शिंगाडे
फ़ोन – ९३७३३५९४५०

पत्ता : अंकुश शिंगाडे- १२२बी, गजानन नगर, भरतवाडा, कळमना मार्केट रोड, नागपूर. महाराष्ट्र
ईमेल - geetshingade454@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक: ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com
**e**sahity@gmail.com
Whatsapp- 9987737237
(विनामूल्य पुस्तके मिळण्यासाठी आपले नाव व गाव कळवा)

प्रकाशन: ५ मार्च २०२३

©esahity Pratishthan®2023

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

**हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.**

# मनोगत



पुरस्कार नावाची कादंबरी वाचकांच्या हाती देतांना मला आनंद होत आहे. ही माझी बहात्तरावी पुस्तक असून ही पुस्तक म्हणजे समाजमनाचा आरसा आहे.

पुरस्कार या कादंबरीचं कथानक असं. एक देवांशू नावाचा मुलगा. त्याच्या घरी त्याच्या मायबापानं जन्माला घातलेली अनेक त्याचे भाऊबंद. त्यातच त्यांना खायला न मिळत असल्यानं त्याच्या मायबापानं त्याला विकलं. पुढे ज्या माणसानं त्याला विकत घेतलं. त्यानंही अत्याचारच केला त्याचेवर. असाच अत्याचारी समाज. त्या समाजातील एक स्री होती रिया. तिनं मोबाईलच्या माध्यमातून त्याचेवर अत्याचारच केला. त्यानंतर त्याचाच फायदा घेवून पुढे मोनिका नावाच्या मुलीनंही त्याला फसवलं. त्यानंतर काय झालं? पुरस्कार म्हणजे नेमकं काय? यात रियाची नेमकी भुमिका कोणती? मोनिकानं कसा त्रास दिला? हे सर्व प्रश्न अनुत्तरीतच आहेत आणि ती ठेवावी लागत आहेत. सांगीतली तर तुम्ही वाचक म्हणून ही कादंबरी वाचणारच नाही.

महत्वाचं म्हणजे आपण ही माझी पुस्तक आवडीनं वाचावी व आवडली का सांगावे. काही चुका सांगाव्यात. जेणेकरुन आगामी पुस्तकात त्या होणार नाही. दक्षता घेता येईल. एवढीच विनंती आहे.

आपण माझ्या गतकाळातील लिहिलेल्या पुस्तकाला जसा प्रतिसाद दिला. तसाच प्रतिसाद याही पुस्तकाला द्याल अशी आशा बाळगतो. तसेच esahity.com प्रतिष्ठानचे आभार मानतो. कारण त्यांच्या प्रयत्नातूनच माझ्या एवढ्या पुस्तकाचं लेखन झालं. त्यापुर्वीही मी बरंच साहित्य लिहिलं होतं. परंतू प्रकाशित होत नव्हतं. म्हणून लिखाणाला तेवढा वेग नव्हता. परंतू ईसाहित्य प्रतिष्ठाननं जसंजसं लेखन प्रकाशित केलं. तसतसा लिहिण्याला वेग आला.

ईसाहित्य प्रतिष्ठान...असं प्रकाशनाचं दालन आहे की जे ऑनलाईन साहित्य प्रकाशित करीत असतात. तसेच वेगवेगळ्या प्रकाराचं लेखन प्रकाशित करीत असतात. फक्त होतकरु लेखक हवा. ईसाहित्य प्रकाशनानं अनेक लेखक समोर आणलेत. ज्यांची लेखणी धारदार आहे. जे खितपत पडले होते, ज्याप्रमाणे एखादा बेडूक एखाद्या गटारात खितपत पडलेला असतो त्याप्रमाणे आणि त्याला तेच विश्व वाटतं त्याप्रमाणे. परंतू ईसाहित्य प्रतिष्ठाननं त्यांची दखल घेतली. त्यांना गटारात राहू दिलं नाही. त्यांना प्रेरीत केलं नव्हे तर लिहितंही केलं. आज तेच लेखक लिहित आहे. ईसाहित्य प्रतिष्ठान कडून ते साहित्य प्रकाशित करीत आहेत आणि नावारुपाला येत आहेत.

मी केवळ ईसाहित्य प्रतिष्ठानचेच केवळ आभार मानत नाही तर त्याबरोबर आभार मानतो त्यांचं. ज्यांनी मला ईसाहित्य प्रतिष्ठान मिळवून दिलं.

ते धर्माबादचे सिद्धहस्त लेखक नासा येवतीकर. तसंच दुसरं एक व्यक्तीमत्व म्हणजे सुनिल सामंतसाहेब. त्यांनी माझ्या लेखनीला बळ दिला.

अलीकडे त्यांनी सांगीतलं की मोठी पुस्तक लिहा. मी लिहिल्याही आणि लिहिणारही आहे मोठ्या पुस्तका. परंतू जेव्हापर्यंत सामान्य वाचकापर्यंत मी पोहोचत नाही. तेव्हापर्यंत छोट्याच पुस्तका लिहिण्याचं धाडस करतोय. कारण अलीकडं लोकांना वेळ नाही. लोकं फक्त मोबाईल पाहात असतात. टिव्ही, यु ट्यूब पाहात असतात. कोणतंही साहित्य वाचनाला अजिबात वेळ नाही त्यांच्याजवळ. ज्या टिव्ही मोबाईलचे दुष्परीणाम पाहायला मिळतात. याही पुस्तकात त्याच दुष्परिणामाचा विचार केला आहे. अशा वाचकांनी पुस्तकं वाचावीत व बोध घ्यावा. म्हणून या लहान पुस्तका. पुढे जेव्हा टिव्ही मोबाईलचा दुष्परीणाम बघता साहित्य वाचनाला वाचकमंडळी वेळ काढतील, तेव्हा मिही मोठी पुस्तक देणार. त्यासाठी वाचक मंडळींनो तुमची पसंती आणि आशिर्वाद द्या.

ईसाहित्य डॉट कॉमवर भरपूर पुस्तका आहेत. फक्त लिंकवर क्लीक करुन कव्हरपेजवर क्लीक करा. पुस्तक उघडते. अगदी सोपी पद्धत. सेवा आहे ही. अगदी निःशुल्क पुस्तक वाचनाची सेवा. पुढे येईलही यावर शुल्क. परंतू सध्या निःशुल्क पुस्तक वाचनाची संधी आहे. त्या संधीचा फायदा घ्या व माझ्यासारख्या इतरही लेखकांची ईसाहित्यावरील पुस्तका वाचून त्यांना एक फोन अवश्य करा. जेणेकरुन त्यांना हुरुप येईल व त्यांच्या हातून दर्जेदार अशा

पुस्तकांची निर्मीती होईल एवढंच सांगणं आहे. काही चुकलं असेल तर माफी असावी.

धन्यवाद!.

आपला नम्र.

**अंकुश शिंगाडे,**

**नागपूर , ९३७३३५९४५०**

ही कादंबरी

जगभरातील

वीरपत्नींना

माझ्या भगिनींना

सादर समर्पित

# पुरस्कार

(कादंबरी)

# अंकुश शिंगाडे

ही कादंबरी काल्पनिक असून या कादंबरीतील स्थळे, व्यक्ती व घटना काल्पनिक आहेत. त्यात कोणाच्याही भावना दुखाविणे हा हेतू नाही. कोणाही स्थळ, व्यक्ती वा घटनेशी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संबंध नाही. तसा तो आढळून आल्यास तो निव्वळ योगायोग समजावा.

# पुरस्कार (कादंबरी)

देवांशू आज हयात नव्हता. परंतू आज त्याचे विचार पुजले जात होते. त्यानं जी पुस्तक लिहिली होती. त्या पुस्तकालाही मोठा पुरस्कार मिळाला होता. तसंच त्याचं साहित्य अभ्यासक्रमालाही अभ्यासलं जावू लागलं होतं. तसंच त्याला आज मोठा पुरस्कारही मिळाला होता. परंतू हे कार्य त्याच्या मरणोपरांत घडलं होतं.

तो पुरस्काराचा काळच होता. त्या काळात पुरस्काराला महत्व होतं. तसं महत्व होतं ते पैशाला. कारण लोकं पैसे भरुन पुरस्कार मिळवीत होते. त्यातच तसा पुरस्कार मिळताच लोकं त्याची बातमी तयार करीत. ती वर्तमानपत्रात छापत असत आणि अभिनंदनाचा वर्षावही झेलत असत.

आज असाच तो काळ. लोकांजवळ पुरस्कार मिळविण्यालायक काहीच नसायचं. तरीही त्यांना पुरस्कार मिळायचे.

दररोज अशा बातम्या वर्तमानपत्रात वाचायला मिळायच्या. त्या बातम्या वाचून वैषमता वाटायची देवांशूला. कारण देवांशूजवळ सर्वकाही होतं पुरस्कार मिळविण्यालायक. परंतू त्याला पुरस्कार मिळत नव्हता.

देवांशू गरीब नव्हता. तो पैशानं पाहिजे त्या प्रमाणात श्रीमंतही नव्हता. परंतू त्याला असं पैशानं पुरस्कार मिळवणं आवडत नव्हतं. मात्र जेव्हा अशा पुरस्काराच्या बातम्या वर्तमानपत्रात छापून येत. तेव्हा मात्र तो अगदी निराश होत असे.

देवांशूजवळ उमेद होती. त्या उमेदीच्या जोरावर त्यानं पुरस्कार मिळविण्यालायक अशा बऱ्याच गोष्टी मिळविल्या होत्या. परंतू त्याला पैशानं पुरस्कार मिळविणं आवडत नसल्यानं तो असा कोणताही पुरस्कार मिळवीत नव्हता वा वर्तमानपत्रातील आवेदनाच्या कोणत्याच बातम्यांना तो भाव देत नसे की ज्या बातम्यातून अमूक अमूक पुरस्कारासाठी आवेदन करा. असं लिहून यायचं. तो आवेदनंही कोणत्याच पुरस्कारासाठी पाठवीत नसे.

*******************

देवांशूचं ते बालपण. अतिशय चिखलात राबत राबत गेलं होतं ते बालपण. त्याचे वडील शेतकरी होते. ते शेतात धानाचे पीक घेत असत. त्या धानाची रोवणी करतांना ते चिखल करीत असत. त्यावेळी आवर्जून देवांशू अलगद शेतात जायचा. त्याला मजा वाटायची. त्यातच त्या चिखलणीच्या खड्ड्यात त्याच्या वडीलाला काही खेकडे दिसायचे. ती खेकडे दिसली की देवांशूचे वडील त्याला पकडायचे. त्याला घरी आणायचे व त्याला भाजून त्याला तिखट मीठ लावून खायचे. असं त्यांचं जीवन अगदी मजेत जात होतं. तसंच लहानपणापासूनच देवांशूचंही जीवन मजेतच जात होतं. ते धानातले खेकडे पकडतांना त्याच्या वडीलाला भिती वाटत नव्हती. तसं त्यालाही. उलट त्यालाही मजा येत होती.

ते देवांशूचं बालवय. ते बालवय अतिशय रम्य वाटत होतं. त्या रम्य वातावरणात देवांशू लहानाचा मोठा होत होता ती मजा पाहात पाहात.

देवांशूचं बालवय अति रम्य असं होतं. पावसाळ्याचे दिवस आले की त्याला फार मजा वाटायची. त्या पावसाळ्यात कधी त्याच्या वडीलाला त्या पाण्यात झिंगेही मिळायचे. कधी ससेही त्या पाण्यात उड्या मारतांना

दिसायचे. कधी मासोळ्याही. तसं पाहता देवांशूचे वडील मांसाहारी असल्यानं त्यांना मांस जास्त आवडायचं.

देवांशूचे वडील शेतात धानाची रोवणी होताच त्याच शेतात पाणी भरुन ठेवायचे व त्या पाण्यात मासोळ्या टाकून ते धान मोठे होईपर्यंत त्याच मासोळ्यावर ताव मारायचे. जसजसं धान मोठं व्हायचं. तसतसे ते मासे संपायचे. आता मासोळ्या मिळायच्या नाहीत.

धानाचे पीक संपल्यावर देवांशूचे वडील पाणी शेताला देवून त्या शेतात गहू पेरुन टाकायचे. गहू पेरुन होताच त्या गव्हाचे कोंब दिसू लागताच त्या गव्हावर रासायनिक खत टाकायचे. त्यानंतर पाणी द्यायचे शेताला. त्या शेताला पाणी देत असतांना शेतातील मातीत लपलेले किडे बाहेर पडायचे. ते किडे खाण्यासाठी शेतावर पांढरेशुभ्र बगळे दिसायचे. त्यावेळी देवांशूचे वडील तीन काड्यांना एकत्र बांधून त्या तीनही काड्या मातीत रोवायचे. त्याला मजबूत धागा बांधून त्याच्या टोकाला लहान लहान मासोळ्या बांधायचे व ते बगळे पकडून त्याची भाजी बनवून खायचे त्याचे वडील. त्याचबरोबर ते कृत्य पाहून देवांशूही तसं कृत्य करुन पाहायचा.

उन्हाळा लागायचा. उन्हाळा लागला की मासे मिळायचे नाहीत. परंतू पाखरं नक्कीच मिळायची. उन्हाळयात झाडांना पालवी फुटायची. ती

पालवी फुटली की त्याचा सुगंध सभोवार दरवळायचा व त्या नव्या पालवीच्या झाडावर पक्षी घरटे बांधत व अंडी घालत असत. त्या पक्षांनी झाडावर घरटी बांधली की देवांशूचे वडील त्या घरट्यावर फासे लावून ठेवायचा व त्या फाशात पक्षांचे पाय अडकले की देवांशूचे वडील त्यांना पकडून त्यांना कापून त्याची भाजी बनवायचे व त्यांना खायचे. त्यावेळी पक्षांचा जीव तळमळायचा. परंतू देवांशूच्या वडीलांना त्या निरपराध पक्षांची दया यायची नाही.

मासमोळी ती मंडळी, कधी कानबैरीत रान मांजरीही पकडायचे ते. कधी किड्यामुंग्याही खायचे आवडीनं ते. लाल मुंग्यांची चटणी बनवून भाकरीसोबत खातांना मजा यायची. त्या मुंग्याबद्दल त्यांना वाटायचं की त्या मुंग्या आपल्याला बळ देतात.

हिंसेला ती मंडळी प्रथम स्थान देत असत. तेच संस्कार पडले होते देवांशूवर. त्यालाही ते खेकडे, ते पक्षी व झिंगे पकडतांना भिती वाटत नव्हती. वडीलांसोबत तोही झिंगेच नाही तर पक्षीही पकडायचा आणि त्यांना स्वखुशीनं कापून हिंसा करायचा. त्यावेळी त्या पाखरांची वा किड्या मुंग्यांची हत्या करतांना त्यालाही वडीलांसारखी कधी दया माया वाटायची नाही. असंच बालपण जात होतं त्याचं. आता तो पाच वर्षाचा झाला होता. त्यातच त्याचं नाव शाळेत टाकलं गेलं.

आज सावित्रीबाई फुलेंचं नाव जगात आहे. जिनं स्वतः संकटं झेलून बंद पडलेल्या स्त्री शिक्षणाला चालना दिली व त्यांच्यात आदर्श संस्कार फुलवलेत. ते आदर्श संस्कार यासाठी तिनं महिलांमध्ये फुलवलेत की त्यामुळं त्या ज्या बाळांना जन्म देतील. ती बाळंही आदर्श संस्काराचे होतील व पुढं समाज आदर्श बनेल व त्याबरोबर देशही. त्या केवळ या महिलांच्या आदर्श गुरुच बनल्या नाहीत तर त्या आदर्श माताही बनल्या त्या स्रियांच्या. कारण त्यांना स्वतःची मुलं नव्हती. म्हणतात की त्यांनी यशवंतरावाला दत्तक घेतलं. परंतू त्याचा काही पुरावा नाही.

अलीकडील काळ पाहिला तर आज कोणीही आदर्श राहिलेलं नाही. ना आजची माता आदर्श राहिलेली आहे. ना तिचा पुत्र ना तिची पुत्री. आज आईच आपल्या जन्मदात्या पुत्रासमोर आदर्श दाखवत नाही तर तिचे पुत्र कसे आदर्श बनतील. हेही एक कोडेच आहे.

ज्याप्रमाणे कधीकधी आई आदर्श दिसत नसते. त्याचप्रमाणे पिताही आदर्श दिसत नसतो. त्यामुळं येणारी ही त्याची पिढी कशी आदर्श दिसेल! असा आदर्श माता पित्याचा सहवास असतांना आपण लोकांकडून आदर्श पुत्राची अपेक्षा कशी काय करु शकतो. करुच शकत नाही.

वास्तवीक जीवनात आपण पाहतो की काही माणसं ही सतत दारुच्या आहारी गेलेली असून ती मंडळी दारु पिवून घरी येत असतात. काही काही माणसं खर्रेही खात असतात. काहीकाही लोकं चोऱ्या करीत असतात. काही देवांशूच्या वडीलांसारखे मासे, पक्षी पकडून हत्या करणारे. हे सर्व त्यांची मुलं पाहात असतात. त्यातील काही अपवाद जर सोडली तर बरीचशी मुलं ही आपले वडील जे काम करतात, त्यांचं अनुकरण करीत असतात. जर त्यांचे वडील दारु पीत असतील तर ती मुलंही दारु प्यायला शिकतात. पक्षी पकडत असतील तर पक्षीही पकडतात.

ते वडील जुवारी असतील तर ती मुलंही जुवारी बनतात. तसेच ते पिते व्याभिचारी असतील तर मुलंही व्याभिचारी. याचाच अर्थ असा की एक पिता जर आपली पत्नी सोडून (त्या बाळाची आई) जर दुसऱ्या परस्त्रीसोबत फिरत असेल तर ती मुलं अशा बापापासून कोणता आदर्श बोध घेतील? कोणताच नाही. उलट त्या मुलांवर त्या कोवळया वयात तेच व्याभिचाराचे संस्कार होत असतात व तेच व्याभिचार पद्धतीनं वागत असतात.

काही काही महिलाही व्याभीचार करतांना दिसतात. त्यांना पती असतांनाही त्या स्त्रिया पतीव्रत न वागता परपुरुषांसोबत बिनधास्त फिरत असतात. अशा महिलांकडून त्यांच्या मुलांनी कोणता बोध घ्यावा. ते कोणताच बोध घेवू शकत नाहीत. उलट त्यांचं अनुकरण करणं सुरु होतं व

त्या मात्यापित्यांनी आपल्या मुलांना चांगलं बनविण्याचा प्रयत्न केला आणि चांगलं बनविण्यासाठी जर शब्दांची ओढाताण केली तर अशी मुलं आपल्या मायबापाला लहानवयापासूनच खडे बोल सुनावीत असतात.

निसर्गनियमच आहे की जे पेराल, तेच उगवेल. जर गहू पेरला तर धान उगवणार नाही. त्यामुळं आपल्या पुत्रांना आदर्श बनवायचं असेल तर त्याआधी आपण स्वतः आदर्श राहायला हवं. म्हणून मुलांना जर आदर्श बनवायचं असेल तर आधी मायबापानं आदर्श वागणं व बनणं गरजेचं आहे. कारण तुम्ही आदर्श असाल तर मुलं आपोआपच आदर्श बनत असतात.

एक प्रसंग सांगतो. एका घरी एक पिता खर्रा खात होता. ते त्यांच्या पुत्रालाही माहीत होते. परंतू त्या वडीलांनी कधीच आपल्या मुलांसमोर खर्रा खाल्ला नाही. त्याचा परिणाम हा झाला की ती मुलं मोठी झाल्यावरही व्यसनाच्या आहारी गेली नाही. असे असावेत मायबापाचे संस्कार. दुसरा एक प्रसंग सांगतो. या प्रसंगात एक आई आपल्या मुलीसमोरच ती मुलगी लहान असतांना तिच्या जन्मदात्या बापाला सोडून गेली. ती काही दिवस दुसऱ्या परपुरुषासोबत फिरली. त्यातच तिच्या पतीला दारुचं व्यसन लागलं व तो अति दारु सेवनानं मरण पावला. ते सर्व चित्र तिच्या जन्म घेतलेल्या मुलीनं पाहिलं व तिही तरुण झाल्यानंतर आपल्या आईसमोर तशीच वागत होती. परंतू आता तिच्या आईला त्याचा त्रास होत होता. परंतू त्याचा आता

काही उपयोग नव्हता. यासाठीच आपण कसेही असलो तरी चालेल, परंतू निदान मुलांवर संस्कार करण्यासाठी तरी मुलांसमोर आपण आदर्श राहावं तसेच आदर्श वागावं.

आदर्श मात्यापित्याची गोष्ट सांगत असतांना एक स्त्री मी अशीही पाहिली की जी आपल्या स्वमुलीला परपुरुषांसोबत व्यवहार करायला लावते. कशासाठी तर पैशासाठी. आधी ती व्यवहार करीत होती आणि आता तिच्या मुलीची इच्छा नसतानाही तिची मुलगी.

कसे संस्कार होतील मुलांवर. खुद्द माता पिताच जर अशा प्रकारचे कृत्य करीत असतील तर... खरंच आजच्या काळात संस्कारच दूर गेलेले आहेत असे म्हटल्यास आतिशयोक्ती होणार नाही.

ज्याप्रमाणे आईवडीलांनी मुलांना आदर्श संस्कार देण्याचे धडे देण्यासाठी त्यांनी स्वतः आदर्श राहायला हवं. तसंच त्या मुलांनी आदर्श राहावं म्हणून त्याच्या शिक्षकांनीही आदर्श राहायला हवं. जर गुरु आदर्श असेल तर त्याचे विद्यार्थीही आदर्श बनू शकतात. परंतू आज चित्र वेगळं दिसतं.

पुर्वीचे शिक्षक हे आदर्श होते. त्यामुळंच सहजच त्याचे विद्यार्थी आदर्श असायचे. परंतू आजच्या काही काही शिक्षकातही आदर्शपण

उरलेलं नाही. आजचा शिक्षक हा व्यसनाच्या आहारी गेलेला असून तोही व्याभिचार करतो. त्यामुळं तोच जर व्याभिचार करीत असेल तर त्याचे विद्यार्थी कसे काय आदर्श बनतील. तेही त्या शिक्षकांकडून अवगुणच घेवू शकतात यात शंका नाही. त्या विद्यार्थ्यांकडून आपल्याला जर चांगली गोष्ट अभिप्रेत असेल तर त्या गुरुनं विद्यार्थ्यांसमोर चांगले संस्कार ठेवावेत. त्यांनीही व्यसन अवश्य करावं. परंतू ते विद्यार्थ्यांसमोर करु नयेत. जेणेकरुन विद्यार्थ्यात चांगले संस्कार फुलतील. ज्याचा त्यांनाच नाही तर समाजालाही फायदा होईल व समाजाव्यतिरीक्त देशालाही फायदा होईल यात शंका नाही. विद्यार्थ्यात जर चांगले संस्कार फुलले तर त्या विद्यार्थ्यांसह समाज पुढे जाईल व त्यानंतर देश. देशही विकासाच्या पातळीवरही वर जाईल असे म्हटल्यास आतिशयोक्ती होणार नाही.

देवांशूही आपल्या वडीलांसारखाच वागायला लागला होता. कारण त्याचेवर त्याच्या वडीलांचे संस्कार होत होते. अशातच त्याचं नाव शाळेत टाकलं गेलं.

देवांशू शाळेत जायला लागला होता. त्यातच त्या शाळेत त्याला एक शिक्षीका शिकवीत होती. ती देवांशूचा अतिशय लाड करायची. त्यातच ती त्याला चांगल्या चांगल्या गोष्टी सांगायची.

ती शिक्षीका. तिच्यावर चांगले संस्कार होते. ते संस्कार तिच्या वडीलांनी केले होते तिच्यावर. ती मांस खात नव्हती अजिबात. कारण तिला कोणाचा जीवघेणं आवडत नव्हतं. तिला वाटत होतं की जर का आपला कोणी जीव घेण्याचा प्रयत्न केला तर आपला जीव तळमळतो. तसंच वाटतं सर्व जिवांना. त्यामुळं तसं करणं पाप आहे. ती त्याच गोष्टी शिकवीत होती वर्गात.

ते बालवय. त्यातच त्या बालवयात देवांशूवर झालेले आईवडीलांचे संस्कार. परंतू आता त्या शिक्षीकेचे त्याचेवर होत असलेले संस्कार. त्याचे काही प्रमाणात त्या कोवळया वयातच विचार बदलत चालले होते. तसं पाहता लवकरच त्याचं मन मांस खाण्यापासून दूर जात होतं. त्यालाही वाटत होतं की आपण मांस खावू नये. आपल्या जिभेच्या चोचल्यासाठी बिचाऱ्या निरपराध पशूपक्षांचा बळी जातो. बिचाऱ्यांना जेव्हा कापतात. तेव्हा त्यांचाही जीव तळमळतो. त्यांनाही मरावंसं वाटत नाही. परंतू बिचारे लाचार असतात मानवासमोर. ते शिक्षकांचं शिकवणं. त्या शिकविण्यानं देवांशू प्रभावीत झाला व लवकरच तो मांस खाण्यापासून दूर गेला.

ते शाळेचे दिवस अति रमणीय वाटत होते. शिक्षक काही चूकलं तर मारत होते. कारणही तसंच होतं. त्या चुका वारंवार विद्यार्थ्यांनी करु नये हा हेतू होता त्यांचा. त्यामुळंच की काय देवांशूचे हात कडक झाले होते.

देवांशूचं शरीरंही बलदंड झालं होतं. त्या रानातील मासोळ्या त्या अगदी लहान वयात पकडतांना त्याला त्या पाण्यातील मासोळ्या काटे मारत अर्थात चावा घेत. तसेच ते झिंगे आणि खेकडेही. अतिशय वेदना होत. परंतू त्या वेदनांवर मात करुन ही मंडळी जगत होती. आजही त्या मंडळींसमोर उद्देश नव्हता.

देवांशू चार पाच वर्ग शिकला होता. त्यातच त्याला समजलं होतं की अन्न बकऱ्या कोंबड्याही मिळवता, तेही जगतात. परिसरातील कुत्रेही उकिरड्यावर जगतात आणि रानातील हिंस्र पशुपक्षीही.

**********************

अलीकडे लोकं जगत असतात. किड्यामुग्यांसारखं जगत असतात असे म्हटल्यास आतिशयोक्ती होणार नाही. कारण त्यांचं जगणं तसंच असतं अगदी. काहीतरी खावून जगणं. मोठं होणं. त्यानंतर विवाह करण. दोनचार पोरं पैदा करणं आणि म्हातारं झाल्यावर नातवांना सांभाळणं. कधी एखाद्यावेळी एखादं मोठं घर बांधणं. एवढ्या गोष्टी सर्वच करीत असतात. यात कसला आला उद्देश? कोणताच उद्देश दिसत नाही यात. आता कोणी

म्हणेल की आहे ना उद्देश. तो घर बांधतो ना. प्राणीमात्रा घर बांधतात का? बरोबर आहे ते. कारण प्राणीमात्राचा विचार केल्यास ते घर बांधत नाहीत. यावर मला लहानपणीची तिसऱ्या वर्गात शिकलेली गोष्ट आठवते. माकडाचं घर.

एक माकड असतं. ते माकड या झाडावरुन त्या झाडावर उड्या मारत असतं. वर्षातून आठ महिने त्याला घर बांधायचं नसतं. कारण पाऊस नसतो. तशी आठवणही येत नसते. परंतू ज्यावेळी पाऊस सुरु होतो, तेव्हा त्याला घर आठवतं. कारण तो ओला होत असतो पावसाने. तेव्हा थंडी लागत असते. माणसाचंही असंच आहे. तो थंडी, ऊन वाऱ्यापासून संरक्षण करण्यासाठी घर बांधतो, परंतू त्यावरती त्याचा काही उद्देश नसतो. मुलं पैदा करणं हा उद्देश नाही. ते कार्य तर प्राणीमात्राही करतात. तेही घर बांधतातच. ज्यावेळी पाखरं अंडे घालतात. त्यावेळी त्या अंड्यांना ठेवण्यासाठी आणि उबविण्यासाठी पाखरांना घर बांधणं आवश्यक असतं. ते अतिशय सुबक घर बांधत असतात. प्राणीही आपल्या पिल्लांना रस्त्यावर जन्म देत नाहीत. तेही गृहेचा वा झााडाझुडपाचा आधार घेतात.

माणसाचं कोणतं तरी एक ध्येय असावं. केवळ मुलं पैदा करण्याला वा जन्माला घालण्याला ध्येय समजू नये. तसंच घर बांधण्यालाही नाही. मग कोणाला ध्येय मानावं. असे ध्येय कोणतेच तर नाही जगात.

लोकं वरील प्रकारचे शब्द नेहमी वापरत असतात. त्यातच कोणी पैसे कमविण्याला ध्येय समजून त्याला आधी प्राधान्य देतात. पैसे प्राणी कमवत नाही असं म्हणतात. परंतू त्यालाही ध्येय मानू नये. मग ध्येय नेमकं कोणतं?

यात आणखी सांगायचं झाल्यास जी मंडळी ध्येय मानतात. त्या मंडळींपैकी कोणी म्हणतात की ध्येय हे उच्च असावं. ध्येय असं असावं. तसं असावं. परंतू नेमकं ध्येय कोणतं ते सांगत नाहीत.

ध्येय नेमकं कोणतं याचा विचार केल्यास निर्मीतीला आपल्याला ध्येय मानता येईल. निर्मीती मग ती कोणतीही असो, घर बांधणं वा मुलं पैदा करणं वा पैसा कमवणं ही देखील निर्मीतीच आहे. तेही ध्येयच आहे. ध्येयालाच उद्देशही म्हणता येईल. परंतू ते सर्वसामान्यांचं ध्येय झालं. पशूपक्षांचं ध्येय झालं ते. कारण तेही एक पैसा सोडला तर घर बांधणे आणि मुलं पैदा करणे या गोष्टी करीत असतात. आपण मानव आहोत. आपण पशूपक्षी नाही. त्यामुळं आपण त्या तीन गोष्टी सोडून इतरही गोष्टी करु शकतो. जसे. मोठमोठे पद प्राप्त करणे, संशोधन करणे, साहित्य लेखन करणे, चित्र रेखाटणे, संगीत, चित्रपट निर्माण करणे, गीत तयार करणे. शोषीतांना न्याय मिळवून देणे. इत्यादी सर्व गोष्टी या ध्येयात मोडतात. माणूस म्हणून आपण जन्माला आलोय ना. मग अशाचप्रकारचं ध्येय ठेवावं जीवनात. आपलं मनोरंजनही होईल.

जीवन हे सुखदुःखानं भरलेलं आहे. अलीकडे दुःखानं कोणालाच सोडलेलं नाही. पशूपक्षांचं दुःख वेगळं. त्यांना तर कळतच नाही की त्यांचा जीव केव्हा जाईल. जंगलात एखादा शाकाहारी प्राणी केव्हा एखाद्या मांसाहारी प्राण्यांचा घास बनेल, ते सांगता येत नाही. तसंच कोंबडे, बकरे, मासे आदींसारखे प्राणी तर जणू मरणासाठीच जन्म घेतात की काय, असं त्यांचं दुःखानं भरलेलं जीवन. आपण त्यामानानं फारच सुखी आहोत. आपल्याला त्या प्राण्यांसारखं कोणी केव्हाही कापत नाहीत. मग आपल्यासारखा एवढा सुखी कोण? कोणीच नाही. मग आपण का बरं लाचारासारखं वागतो. नेहमी आम्हाला फारच दुःख आहे असं आपलं तुणतुणं असतं. तेच तुणतुणं हालवत आपण आपला उद्देश संपवतो.

आपलाही उद्देश असावा. विलक्षण असा उद्देश असावा आपला. शिवरायांसारखं ध्येय आपलंही असावं. डॉ. बाबासाहेबांसारखा ते प्राप्त करण्यासाठी खटाटोप असावा आणि सावित्रीबाई फुलेंसारखी निष्ठा असावी. थॉमस अल्वा एडीसन शिकला नव्हता, परंतू ध्येय उच्च होतं त्यांचं. त्यांनी त्याच ध्येयाच्या जोरावर अख्ख्या जगासमोर उजेड निर्माण केला आणि मायकेल फरेडे...तोही शिकला नव्हता. परंतू त्यानं जग जवळ आणलं डिझल इंजीन बनवून. लुई पाश्चर दोन वर्ग शिकला होता फक्त. परंतू इंजेक्शनं तयार केलीत त्यानं.

आज अशी कितीतरी माणसं अशी आहेत की जी शिकलेली नव्हती. परंतू उच्च ध्येयानं ती आजही आठवतात आपल्याला. ध्येय प्राप्तीसाठी केवळ शिकावं लागत नाही. हं, शिकल्यानं थोडीशी बुद्धी वाढते. काहींची जास्तच वाढते. ती मंडळी चांगलं करीतच नाही कधी.

शिका. मी सारखा शिकू नका म्हणत नाही. शिका. परंतू शिकल्यावर आपलं ध्येय विसरु नका म्हणजे झालं. काही काही मुलं शिकतात, शिकल्यानंतर ते काम मिळवतात. ध्येयही गाठतात. परंतू मायबापाची सेवा करु शकत नाहीत. असं शिकणं कोणत्या कामाचं आणि ते त्यांचं ध्येयही कोणत्या कामाचं?

विशेष म्हणजे माणसानं माणूस म्हणून जन्म घेतला ना. कधीतरी तो मरणारही आहे. कारण जे अस्तित्वात आहे. ते कधीतरी संपणारच. ते शाश्वत नसतं. त्यात तो किती शिकला आणि किती नाही हे पाहता येत नाही आणि पाहूही नये. फक्त त्यानं काय काय केलं हे पाहावं.

आज घर बांधण्याची स्पर्धा सुरु आहे. जणू स्पर्धाच लागली आहे. जे आपलं ध्येय नाही. अन् जे ध्येय आहे, त्याचा विसर पडत चालला आहे आपल्याला. ज्या घराला, गाडीला, पैशाला आपण आपलं ध्येय समजतो ना. ते ध्येय मरणानंतर कधीच सोबत येत नाही. मरणानंतर त्यानं किती

कमवलं हे कोणीही पाहात नाही. कोणी केवढं घर बांधलं हे कोणीही पाहात नाही. तसंच कोणं कोणती गाडी घेतली होती. तेही कोणी पाहात नाही. पाहतात फक्त त्यानं कोणतं कार्य केलं ते. त्यानं केलेल्या चांगल्या कार्याचं मुल्यांकन होतं. वाईट कार्याचं नाही. त्याचबरोबर हे चांगलं कार्य तेव्हाच होतं. जेव्हा चांगलं उद्दीष्ट्य डोळयासमोर असतं. माणसानं जगावं. जगण्याचाही उद्देश असावा. तो उद्देश चांगला असावा. त्यानुसार चांगले कार्य घडेल. जेणकरुन आपलं मरणानंतरही कोणी नाव घेईल व मृत्यूनंतरही आपलं नाव होईल. कारण पैसा कोणीही कमवतो. घर कोणीही बांधतो. परंतू असं कार्य कोणीही करीत नाही की ज्या कार्यानं माणसं नावारुपाला येतील. अमर राहतील. महत्वाचं म्हणजे त्यासाठी त्याचं ध्येय चांगलं असलं पाहिजे. उद्देशही चांगला असला पाहिजे. तसंच जीवनात जर समोर जायचं असेल तर कोणतंतरी ध्येय वा उद्देश असला पाहिजे एवढंच सांगावेसे वाटते.

आपण काहीतरी बनावं असं देवांशूला सहावीपासूनच वाटायला लागलं होतं. त्यातच पशूपक्षांनाही जीव असतो. हेही त्याला वाटायला लागलं होतं. देवांशू सहावीत होता. तो एकटाच होता घरी असे नाही. देवांशूच्या वडीलांनी सात मुलं जन्माला घातली होती. ते त्यांचं अडाणीपण. त्या अडाणीपणातून सात मुलं जन्माला आली होती. त्यामुळं त्याला त्याचे

आईवडील चांगले विचार देवू शकत नव्हते. परंतू त्याला चांगले विचार मिळाले. ते त्याला मिळालेले चांगले विचार, ते चांगले विचार त्याला त्याच्या शिक्षकांकडून मिळाले होते.

देवांशू जेव्हा सहावीत गेला. तेव्हाही त्यांच्या घरची परिस्थिती खालावलेलीच होती. घरी खायला असणारी नव तोंड देवांशूचं पोट भरु देत नव्हती. त्यातच आता देवांशूही मासे पकडायची कामं करीत नव्हता. ना मांजरं पकडत होता कानबैरीतील. तशी ती प्राण्यांच्या मांसावर ताव मारणारी मंडळी. परंतू देवांशूनं मासे पकडायला नकार दिल्यानं त्याच्या वडीलांना ती गोष्ट खटकत होती. त्याचबरोबर वाटत होतं की जर देवांशूनं मासे पकडले नाही तर उद्या आपण उपाशी मरु. तसंच देवांशूचं पाहून त्याचा परिवारही मासे पकडणार नाही. असं वडीलांना वाटलं.

देवांशूच्या वडीलाचं नाव सितांशू होतं. सितांशूजवळ शेती होती. परंतू ती फार मोठी नव्हती. ती अतिशय अल्प असून त्या शेतीवर मुळात पोट भरत नव्हतं. त्यातच त्यानं जन्माला घातलेली एवढी मुलं. त्यामुळं त्याला त्या मुलांचं पोट भरता येत नव्हतं. त्यातच त्यानं ठरवलं की आपण देवांशूला विकायचं. कारण एकतर एवढ्या मुलाचं संगोपन करु शकत नाही. त्यातच हा मुलगा म्हणजे भुईला भार. हा मुलगा मला ना मासे पकडायला मदत करत ना हा मुलगा मांजरे पकडत.

देवांशूला विकायचं हा बेत मनात घेवून एक दिवस सितांशूनं त्याचा सौदा केला.

श्रीधर नावाचा तो गृहस्थ. त्या गृहस्थाने देवांशूला विकत घेतलं.

श्रीधरला स्वतःची मुलं होती. परंतू त्याची मुलं त्याचं मुळातच ऐकत नसल्याने त्यानं देवांशूला आपली सेवा करुन घेण्यासाठी विकत घेतलं. त्याचबरोबर देवांशूचं स्वप्न भंगलं. देवांशूचं स्वप्न म्हणजे त्याला शिकायचं होतं.

श्रीधरला देवांशू रुपात मुलगा मिळाला होता त्याची सेवा करायला. घरी मुलांची व परिवाराची होत असलेली आबाळ लक्षात घेवून सितांशूनं आपल्या स्वमुलाला विकून टाकलं होतं. तसं पाहता श्रीधरनंही आपल्याला एक नोकर मिळतो, म्हणून जास्त दाम देवून विकत घेतलं होतं देवांशूला. ते सितांशूनं टाकलेलं स्वलेकराप्रतीचं पाऊल योग्य नव्हतं. असं जे करु इच्छीतात. त्या कोणत्याही मायबापाला सूट देवू नये. बालकांची सुरक्षितता व्हावी. मायबापानाही शिक्षा व्हावी.

***********************************

एक हजार बारा. चोवीस तास टोल फ्री क्रमांक. म्हणतात की हा क्रमांक चाईल्डलाईनचा आहे. बालकांची सुरक्षा करण्यासाठी हा क्रमांक वापरावा. परंतू तो अजिबात लागत नाही असं काही लोकांचं म्हणणं आणि मानणंही. आता हा क्रमांक एकशे बारा होणार. असा युक्तीवाद आहे. जो क्रमांक पोलिसांचा आहे.

चाईल्डलाईनची देशभरात एक हजार सत्तर केंद्रे आहेत. तसेच अकरा हजार फिल्डवर्कर आहेत. ही चाईल्डलाईन देशभरात संकटात सापडलेल्या लोकांना नव्हे तर बालकांना मदतीचा हात देते तसेच सरकारच्या बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांमार्फत ही हेल्पलाईन वापरली जाते.

बालक सुरक्षा... बालकांची सुरक्षा व्हायला हवी असे कायद्यात लिहिले आहे. परंतू कायद्यानुसार बालकांची सुरक्षा खरंच केली जाते का? हा प्रश्न आहे. कारण आज स्वतःच मायबाप आपल्या स्व मुलांना सोडून पसार होतात.

मुलांना, त्या मुलांचे मायबाप स्वतः सोडून पसार होतात! कोणी म्हणतील की हे खोटं आहे. परंतू हे खोटं नाही. मायबापाचं तसं पसार होण्याची काही मुख्य कारणे आहेत. पहिलं कारण म्हणजे पालनपोषण. मायबाप भरपूर मुलांना जन्माला घालतात. त्यातच अशा भरपूर मुलांचं

संगोपन करतांना अनेक अडचणी येत असतात. या अडचणीचा सामना करतांना खुद्द ते स्वतःचे मायबाप त्याला रेल्वेस्टेशनवर वा बसस्टँडवर वा जत्रेत सोडून देतात.

दुसरं कारण म्हणजे काही मुलं अनैतीक संबंधातून जन्मतात. अशा मुलांचा सांभाळ कोणतीच आई करु शकत नाही. त्यावेळी ती आई सुद्धा आपल्या स्व मुलांना सोडून जाते आणि तिसरं कारण म्हणजे काही मायबाप हे आपल्या अनैतिक संबंधासाठी स्व लेकरांना सोडून दुसऱ्या लोकांसोबत पळून जातात.

आज बालकांची सुरक्षा, असे जर मायबाप असले तर कशी करावी? हा विचार करायला लावणारा प्रश्न आहे. सरकारकडं कायदे आहेत. परंतू ते कायदे कुचकामाचे आहेत. काही लोकं सांगतात की अशा बेवारस मुलांची तक्रार घेवून पोलीस स्टेशनला जावे. परंतू पोलीस स्टेशनला गेल्यास पोलीस म्हणतात की साहेब, आम्ही काय करावं. या नेहमीच्या घटना आहेत. आम्ही फक्त एक मदत करु शकतो. या मुलांना आम्ही आमच्या मदतीनं अनाथालयात पाठवू शकतो.

अशा घटना... अशा एक नाही अनेक घटना. या घटना समाजात घडत आहेत. यात दोष नेमका कोणाचा? लेकरं म्हणून त्या आईच्या पोटी

जन्माला आलेल्या बाळाचा की खुद्द त्या मातापित्यांचा. ज्यांनी त्या मुलांना जन्माला घातलंय. जर त्या मुलांचा सांभाळ करण्याची ताकद धमणीत नसते तर कशाला जन्माला घालावी एवढी मुलं आणि जर आपण जन्माला घातलेलं मुल आपल्याला सांभाळता येत नाही तर कशाला करावं असं अनैतीक प्रेम? असं प्रेम की त्या प्रेमातून त्या बालकाच्या प्रेमाची हत्या व्हावी. विकावं लागावं बाळाला. स्वलेकरालाच. ही न पटणारी गोष्ट आहे. परंतू समाजात अशा घटना वारंवार घडत आहेत. परंतू त्या घटना लपूनचोरुन घडत असल्यानं उजेडात येत नाहीत.

याबाबतीत सांगतांना मी आणखी आवर्जून सांगेन की काही मायबाप याही पुढे जातात. ते आपला घरखर्च चालविण्यासाठी आपल्या स्व लेकरालाही विकतात. ही देखील गंभीर बाब आहे. त्यानंतर हीच मुलं अशा मायबापाच्या क्रूर कृत्यातून अत्याचाराच्या शिकार बनतात.

महत्वाचं म्हणजे कशाला जन्माला घालावी मुलं? जर पोषता येत नसेल तर...परंतू लोकं याचा विचार करीत नाहीत. मुलांना त्या विधात्याची देण समजत जन्म दिला जातो. खूप मुलं पैदा केली जातात. त्यातच त्या विधात्यालाही ते सोडत नाही. त्यालाही दोषी धरलं जातं.

याबाबत महत्वाचं सांगायचं झाल्यास उगाच मुलांना जन्म देवू नये. जेणेकरुन मुलांची फसगत होईल. मुलांना त्रास होईल. जेवढ्या मुलांना पोषता येवू शकते. तेवढ्याच मुलांना जन्माला घालावं. बालकांची सुरक्षा स्वतःच मायबापानं करावी. उगाच फोनचा वापर करुन फोन न लागल्यास सरकारला दोष देवू नये. चाईल्डलाईन अशा लोकांच्या मुलांसाठी नाही. चाईल्डलाईन आहे, त्या मुलांसाठी...ज्या मुलांवर समाजकंटकांकडून अत्याचार होत असतात.

बालकांची सुरक्षा व्हावी हा उदात्त हेतू लक्षात घेवून असे प्रकार करणाऱ्या मायबापांना शोधावे. त्यांना शोधणे आता सहज सोपे झाले आहे. तशा मायबापांना शोधण्यासाठी अलीकडे युनिक आयडेंटिफिकेशन ॲथॉरिटी हे माध्यम आले आहे. या माध्यमातून अशा मायबापांना शोधून त्यांना चांगला चोप देण्याची गरज आहे. त्यांना जबर शिक्षा देण्याची गरज आहे. जेणेकरुन ते मायबाप अशा मुलांना कुठेही सोडणार नाहीत व शिक्षा होते म्हणून जास्त मुले जन्मालाही घालणार नाहीत.

सितांशूनं आपल्या स्वलेकराला विकायचं कृत्य केलं. त्यानं आपल्या लेकराला लपूनचोरुन विकलं. त्यातच ते लेकरु ज्यानं विकलं, त्याला शिक्षेचं प्रावधान नसल्याने सितांशू सहजच सुटला. परंतू यामुळे पुढील

जीवनात देवांशूचं मोठे हालहाल झाले. त्याचं शिक्षण तर सुटलं. उलट त्याला पोटभर जेवायलाही मिळत नव्हतं.

देवांशू लढत होता आपल्या जीवनाशी. त्याला शिक्षण शिकायची इच्छा असूनही त्याचं शिक्षण बंद झालं होतं. परंतू त्याच्या मनात उद्देश होता. आपण काहीतरी मोठं कार्य करावं. तसा तो त्या कार्याच्या दिशेनं वाहावत गेला.

देवांशूचं शिक्षण सुटलं असलं तरी त्याची प्रतिभा कोणी चोरुन नेली नव्हती. ती अजूनही अस्तीत्वात होती त्याचेजवळ. त्यातच तो आता कविता बनवायला लागला होता आणि वेळ मिळेल तेव्हा काहीतरी सुचलेल्या गोष्टी लिहायचा. याच पद्धतीनं तो एक कवी बनला होता आणि लेखकही. त्याची प्रतिभा निखारत चालली होती.

श्रीधर म्हातारा होता. तो देवांशूवर प्रेम करीत नसे. देवांशूकडून तो काम घेत असे. त्यातच तो कधीकधी त्याला भिक्षा मागून आणायचेही काम सांगत असे.

देवांशू भिक्षा मागायला लागला होता. तसं त्याला श्रीधरच्या घरी कोणतं असं स्वातंत्र्य नव्हतं. त्याला कधीकधी रडू कोसळत असे.

हळूहळू त्याची कवीमनाची प्रतिभा निखारत चालली होती. त्यातच तो एकदाचा प्रसंग घडला. तो प्रसंग त्याला दाग लावून गेला.

श्रीधरजवळ स्मार्टफोन होता. एकदा असाच श्रीधर घरी नसतांना एक फोन आला. त्यावेळी देवांशू एकटाच घरी होता. त्यावेळी त्यानं श्रीधरचा फोन उचलला. तिकडून आवाज आला.

"हैल्लो, मी रिया बोलतेय."

"बोल, कोण हवंय तुला?"

"तू एकटाच घरी आहे ना."

"होय. मी एकटाच घरी आहे. का बरं?"

"तू देवांशू बोलत आहे ना."

"होय मी देवांशूच. का बरं."

"मला बोलायचं आहे तुझ्याशी. बोलते ना."

"होय बोलते."

"मला मैत्री करायची तुझ्याशी. बोल करशील ना."

"होय करेल."

"पण मला मोबाईलवर बोलणं आवडते. बोल, बोलशील ना."

"होय, बोलेल. परंतू हा फोन माझा नाही. हा फोन दुसऱ्याचा आहे."

"ठीक आहे. तुला जेव्हा सवड मिळेल, तेव्हा बोलशील माझ्याशी. तूच फोन लावशील मला."

"ठीक आहे." असं म्हणत त्यानं फोन ठेवला.

देवांशूही तरुणच होता. तो रियाशी बोलायचा. श्रीधर घरी नसला आणि त्याचा फोन घरी असला की तो त्याच फोनवरुन रियाला फोन लावायचा. तसा तो त्या दिवशीचा प्रसंग. रियाचा त्याला फोन आला होता.

"व्हिडीओ कॉल कर. मला तुझ्याशी व्हिडीओ कॉलवर बोलायचं आहे. तुला पाहायचं आहे मला."

"का बरं?"

"तुला बोलायचं नाही का?"

"बोलायचं आहे."

"मग कर ना व्हिडीओ कॉल."

तो रियाचा फोन. तिला देवांशूनं व्हिडीओ कॉल केला. त्यातच त्या व्हिडीओ कॉलवर तिकडून ती रिया नावाची मुलगी बोलू लागली. तीच संधी साधून तिचं त्याचेसोबतचं अश्लीलतेनं संभाषण. देवांशूच ते वय. ते वयच तसं होतं.

रिया नावाची ती मुलगी. त्या मुलीनं ऑनलाईन फोन लावला नव्हे तर व्हिडीओ कॉल केला. तसं पाहता तिनं अश्लीलतेचं प्रदर्शन केलं. त्यानंतर तिनं ते अश्लीलतेचं प्रदर्शन रेकॉर्डींग केलं.

थोड्या वेळाचा अवकाश. त्यातच त्या श्रीधरच्या मोबाईलवरच व्हाट्सअपवर एक व्हिडीओ क्लीप आली. त्या क्लीपमध्ये पुर्णपणे देवांशूच्या नग्नपणाचं चित्रीकरण होतं व थोड्याच वेळात फोन आला व फोनवर धमकी आली की त्यानं व्हिडीओ कॉलवर अश्लील प्रदर्शन केलं आहे. त्याचा मुआवजा तिला द्यावा. नाहीतर ती त्याची तक्रार पोलिसांना करणार आहे.

देवांशू पुरता घाबरला. तसं पाहता तो श्रीधरच्याच घरी राहात होता. त्यानं दिलेल्या तुकड्यावर तो लहानाचा मोठा होत होता. तो त्याचा गुलामच होता आणि गुलामाला कोणतीच अब्रू नसते असं त्याला तिथं वागवत होते.

आज त्याला आलेली ती रियाची धमकी. त्यातच घाबरुन गेलेला देवांशू. त्यानं त्या मोबाईल कॉलवर खरी खरी माहिती तर रियाला दिली. त्यात त्याला तसं काही होणार याची माहिती नव्हती. परंतू तसा

अब्रूनुकसानीचा मेसेज व कॉल येताच तो घाबरला व त्यानं तो कॉल पुन्हा येवू नये म्हणून तो मोबाईल नंबर ब्लॉक केला.

मोबाईल क्रमांक ब्लॉक केला खरा. परंतू त्या फोनवर तिचे फोन वारंवार येवू लागले. ती गोष्ट श्रीधर बोलतो असे सांगताच ती बोलायची नाही. कधीकधी श्रीधर घरी नाही असं पाहून ती बोलायची. त्याला धमकीही द्यायची. तशी ती गोष्ट एक दिवस श्रीधरला माहीत झाली व श्रीधरनं त्याला घरातून हाकलून दिलं.

देवांशूला श्रीधरनं घरातून हाकलून दिलं. परंतू रियाचा फोन काही पिच्छा सोडत नव्हता श्रीधरचा. अशातच एक दिवस श्रीधर म्हणाला रियाला की अशी धमकी देण्यापेक्षा तिनं त्याची तक्रार पोलीसस्टेशनला टाकूनच द्यावी. त्याच धमकीच्या अनुषंगानं आज रियानं ती देवांशूची व्हिडीओ क्लीप जोडून पोलीसस्टेशनला तक्रार दाखल केली होती व पोलीस त्या तक्रारीनंतर देवांशूला शोधत फिरत होते.

**********************

सावधान ; सेक्सटार्शनचे बळी जात आहेत. असा विषय मांडला तर लोकांना खरंच आश्चर्य वाटेल. आश्चर्य या गोष्टीचं की नेमकं सेक्सटार्शन लोकांना समजलं नाही म्हणून आश्चर्य. तसंच दुसरं आश्चर्य म्हणजे सेक्सटार्शनचा ज्याला अर्थ समजला, तो विचार करीत असतो की अमुक व्यक्ती जो सेक्सटार्शनचा शिकार झाला. तो स्वतः त्याचा शिकार झाला असून त्याला कोणी शिकार केलं आहे. हे समाज मानत नाही. समाजाला याचंही आश्चर्य वाटतं.

सेक्सटार्शन...नेमकं काय आहे सेक्सटार्शन. त्याचा अर्थ असा की व्हीडीओ कॉल करुन समोरुन कोणीतरी महिला किंवा पुरुष बोलते. त्यानंतर त्या व्यक्तीशी जी व्यक्ती बोलते. ती व्हीडीओ कॉलवर अश्लील बोलते. अश्लील वागते आणि अश्लील कृत्यही करते. अश्लील कृत्य करूनही घेते. त्याचं रेकॉर्डही करते. त्यानंतर ती व्यक्ती ते केलेलं रेकॉर्डींग त्या व्यक्तीला पाठवून धमकी देते आणि धमकीत म्हणते की तू मला एवढे एवढे पैसे दे. नाहीतर मी हा व्हिडिओ पोलिसात देईल.

ही भिती...ही भीती दाखवताच माणूस घाबरतो व त्यानंतर त्या भीतीनं आपली बदनामी होईल असे वाटून आपण त्या व्यक्तीला, त्या व्यक्तीनं जेवढे पैसे मागीतले तेवढे देतो. हेच ते सेक्सटार्शन.

अलीकडे सेक्सटार्शनचा हा प्रकार जोर पकडत आहे. अशी एक टोळी सक्रीय आहे की जी अशा प्रकारचं कृत्य करीत आहे. त्या टोळीचे काही सदस्य एखाद्याला फोन करतात. त्यानंतर त्या फोनवर जर पुरुष बोलत असला की तो फोन स्रीकडे हस्तांतरीत केला जातो. मग अश्लील संभाषण सुरु होतं. त्यानंतर बरंच काही. मग धमक्या. धमकीत तोतया पोलीसही फोन करतो. तो धमक्या देत म्हणतो की तुमची अमूक अमूक प्रकारची केस अमूक अमूक ठिकाणी आली असून तिचा निपटारा जर करायचा असेल, तर एवढे पैसे द्यायला हवे. मग अशी भीती त्या तोतया पोलिसांनी दाखविल्यास फालतूची कटकट मागे लागेल व समाजात बदनामी होईल, या भीतीन त्या व्यक्तीनं जेवढे पैसे म्हटले तेवढे पैसे बऱ्याच जणांनी आतापर्यंत पाठवले आहेत. पैसे गेले आहेत व ते लोकं फसले आहेत. यात बरेच जण अनभिज्ञ आहेत. कारण असा प्रकार बऱ्याच जणांना अजूनही माहीत नाही.

अश्लील गोष्टी. आज बरेच जण या गोष्टीत आंबटशौकीन आहेत. कधी कधी हा प्रकार सेक्सटार्शनसारखा जिवावर बेततो. तरी लोकं सुधारत नाहीत यापासून किंवा साधा बोधंही घेत नाहीत. तरी समाज शिकला सवरला आहे.

या सेक्सटार्शनमध्ये केवळ अडाणी फसतो असा नाही तर बरीच सुशिक्षीत माणसं फसतात. जी शिकली आहेत. उच्च शिक्षण शिकली आहेत. एक प्रकारे अडाणी परवडले की जे अशा प्रकाराला बळी पडत नाहीत. कारण ते असे बळी पडण्यापुर्वी दहावेळा विचारपूस करतात. शहानिशा करतात. मगच हात टाकतात अशा प्रकारात. त्यात जर फायदा असेल तरच ते हात टाकतात असे म्हटल्यास आतिशयोक्ती होणार नाही.

पुर्वी असेच लोकांना लुबाडण्याचे प्रकार झाले. फोन यायचे. त्यानंतर विचारलं जायचं की अमूक कामासाठी तुमच्या पतीनं ओटीपी मागितलाय. तो सांगा किंवा तुमचा आधार अपडेट करायचाय. ओटीपी सांगा. मग ओटीपी सांगीतला की बस एका मिनीटात आपले पैसे गायब व येणारा मोबाईल नंबरही गायब. पैसे कुठे गेले हे कळायला मार्ग नव्हता. आता ही गोष्ट बऱ्याच जणांना माहीत झाली व लोकं सावधान झाले. आता अशा प्रकारचा ओटीपी कोणी देत नसल्यानं अशा सक्रीय टोळीनं पैसे कमविण्यासाठी नवीन मार्ग शोधलाय. त्यालाच सेक्सटार्शन असं नाव देता येईल.

एक प्रसंग सांगतो. महाराष्ट्रातच घडलेला प्रसंग. असाच एका व्यक्तीला एक फोन आला. त्यानंतर त्यानं त्या व्यक्तीला पन्नास हजार दिले. त्यानंतर ती गोष्ट त्यानं आपल्या पोलीस असलेल्या मित्राला सांगीतली.

दुसऱ्या दिवशी त्या पोलीस असलेल्या मित्रानं ती तक्रार ऑनलाईन दाखल झाली असं सांगून ती आपल्याच पोलीसस्टेशनला आहे असं सांगीतलं व ती केस निपटवून देतो असं बोलून त्या आपल्याच मित्राकडून पुन्हा पन्नास हजार रुपये घेतले. असा एकुण एक लाखाचा चुना लागला.

अलीकडे कोणीही कोणाला मोबाईलवर फ्रेंड रिक्वेस्ट पाठवतो. त्यानंतर हळूहळू तो बोलायला लागतो. मग अश्लीलतेचं संभाषण सुरु होतं. स्क्रीन रेकॉर्ड वैगेरे सर्वकाही. काही मुली तर अशा असतात की अशा फेसबुकवर त्या मैत्री करतात. व्यतिरीक्त बोलणाऱ्यांना बोलण्यासाठी मोबाईलवर रिचार्जही मारुन मागतात. तसेच घरखर्चासाठीही पैसेही मागतात. काही मुली मात्र यू ट्यूब चैनल सबक्राईब करा असे म्हणून यू ट्यूबवरुन पैसेही कमवू पाहतात.

पैसे उकळण्याचे हे नवनवीन प्रकार. आपण साधे भोळे. आपल्याला या प्रकाराची कल्पना नसते व आपण फसत जातो. त्यानंतर आपल्यावर अशी मंडळी दबाव टाकत जातात व नाईलाजानं शेवटी बदनामीच्या धाकानं आपण आपल्याजवळ पैसे नसल्यास आत्महत्याही करतो. हे तेवढंच खरं आहे.

सेक्सटार्शनपासून वाचण्याचे अनेक उपाय आहेत. त्यापैकी महत्वाचे काही उपाय सांगता येतील.

कोणीही अनोळखी नंबर उचलू नये. त्यावर जास्त बोलू नये. फेसबुकवर अनोळखी व्यक्तींशी मैत्री करु नये. कोणाशीही फोनवर तरी अश्लील बोलणं बोलू नये. समजा चुकून असं काही घडलंच तर न घाबरता, शांत राहून त्यावर कोणाला विचारुन मार्ग काढावा. शक्यतोवर जवळच्या पोलीस स्टेशनला त्याची न घाबरता तक्रार करावी. महत्वाचं म्हणजे समोरील व्यक्ती कितीही ओळखीची असली तरी त्याचे म्हणण्यानुसार आपण तसे कृत्य वा निर्णय मोबाईलवर तरी करु नये. आपण स्वतः विचार करुन योग्य निर्णय घ्यावा. कोणाच्या मतानुसार वागू नये. आपण स्वतः निर्णय घ्यायला सक्षम असावे.

वरीलप्रकारे पंचसुत्री वापरली की आपण कोणाच्या जाळ्यात त्यानं कितीही ओढलं तरी फसत नाही आणि कोणीही फसू नये. सर्वांनी सावधान व्हावे. कारण आता जग हे धोका देणारं बनलं आहे. या काळात लोकं प्रसंगी काम करीत नाहीत. कंटाळा करतात. तसेच कमी श्रमात जास्त पैसा कमवायला पाहतात. असाच जास्त पैसा कमविण्याचा एक प्रकार म्हणून अलीकडे सेक्सटार्शन हा प्रकार आला आहे. ह्या प्रकारालाही कोणी घाबरुन

जावू नये. प्रतिकार करावे. शक्यतोवर चर्चा करावी. मित्रावर विश्वास ठेवू नये. तसेच शक्य झाल्यास पोलीस स्टेशनचा रस्ता पकडावा म्हणजे झालं.

देवांशू सेक्सटार्शनचा बळी ठरला होता. नकळत त्याच्या हातून चूक घडली होती व रियानं ती तक्रार पोलिसांना केली होती व पोलीस त्याचा शोध घेत होते.

देवांशूला त्या श्रीधरनं घरातून बाहेर काढताच तो फिरत होता रस्त्यावर. तसा तो भीक मागून जगत होता. तसं पाहता पोलीस त्याच्या मागावर होते. ते शोध घेत होते त्याचा. परंतू तो रस्त्यावर फिरत असल्यानं व त्याचा कोणताच ठावठिकाणा नसल्यानं तो सापडत नव्हता.

ती तक्रार त्या पोलीस अधिकाऱ्याच्या हातात होती. त्या अधिकाऱ्याचं नाव विजय होतं. विजय त्याच्या मागावर होता.

देवांशूचं वय वाढत चाललं होतं. तसा तो कविता आणि लेखही लिहायला लागला होता. त्याचे लेख आज वर्तमानपत्रात येवू लागले होते. आज तो पुस्तकंही लिहू लागला होता. त्यातच ती पुस्तकं गुगलवर टाकू लागला होता.

आज देवांशूची प्रसिध्दी वाढत चालली होती. परंतू तो पुरस्कार मिळवू शकत नव्हता. कारण त्याला ती केस माहीत होती.

तो रियाचा खटला. अचानक त्या तरुण वयात पाहिजे त्या प्रमाणात मत विकसीत न झाल्यानं त्यानं ते मोबाईलवर बोलण्याचं तेही अश्लील संभाषण करण्याचं कृत्य केलं होतं.

त्या खटल्याच्या निमित्यानं विजय त्या वर्तमानपत्रात आलेल्या पत्यावर धाड टाकत असे. परंतू देवांशू वाटसरुच होता. तो भीक मागून जगत होता. त्यामुळं त्याचा मुक्काम नेमका ठरलेला नसे. अशातच तो जेव्हा आपले लेख वर्तमानपत्रात टाकत असे. तेव्हा तो आपलं स्वतःचं नाव टाकत असे. त्यामुळं त्याला पोलीस नाकी नव आणतात याची कल्पना होती त्याला.

एक दिवस तो विचार करीत बसला होता. त्याला त्या खटल्याचा विचार होता. तशी त्याला युक्ती सुचली. ती युक्ती होती टोपण नावानं लेखन करण्याची. आता तो टोपण नावानं लेखन करीत होता. स्वतःवरील दाग लपविण्यासाठी.

देवांशूचं लेखन हे उच्चप्रतीचं होतं. ते उच्चप्रतीचं लेखन वर्तमानपत्रात छापून येताच ते अति गाजत होतं. त्यातच त्यानं लिहिलेली पुस्तकं. ती पुस्तकंही फार गाजत होती. ती गाजणारी पुस्तकं त्याचं नाव मोठं करीत होती. तसे त्याचे मित्रमंडळही तयार झाले होते.

देवांशूची अनेक पुस्तके. ती पुस्तके पाहता व त्याचं लेखन पाहता अनेक लोकं जे त्याचे हितचिंतक होते, ते त्याला त्या पुरस्काराबाबतच्या गोष्टी सांगत. ते तशा गोष्टी सांगतांना म्हणत असत की त्यानं पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठवावा. त्यानं तसा प्रस्ताव पाठवून राज्य सरकारचा पुरस्कार मिळवावा. परंतू तो राज्य सरकारला प्रस्ताव पाठवणार कसा? तसा प्रस्ताव पाठवतांना जवळच्या पोलीस स्टेशनचं पत्र लागायचं. ते पत्र म्हणजे त्याचेवर कोणताच खटला सुरु नाही याचा दाखला असायचा.

देवांशू तसा प्रस्ताव पाठवू शकत नसे. कारण त्याला माहीत होतं की आपलीही गतकाळातील एक केस आहे. जी केस अनवधानानं घडली आहे. ती अनवधानानं घडली असली तरी तो एक गुन्हाच आहे. एखादा अपघातही अनवधानानं होतो, याचा अर्थ असा नाही की तो अपघात अनवधानानं झाल्यामुळं त्याची क्षती माणसांना पोहोचणार नाही. त्याची क्षती पोहोचणारच. तो अपघात जरी अनवधानानं घडला असला तरी. तसं गुन्ह्याचं आहे.

गुन्हा...गुन्हे अलीकडे बरेच जोर पकडत आहेत. वर्तमानपत्रात नेहमीच गुन्ह्यांचे स्वरुप छापून येत असतं. कधी कोणी कसा चाकू मारला याचं वर्णन छापून येतं तर कधी शेतकरी आत्महत्या कशी घडली ते छापून येतं. कधी अमूक ठिकाणी बलात्कार झाला व त्यात खुन केला गेला. कधी चेहरा

विद्रूप केला गेला. कधी चोरी झाली असं येतं. तर कधी अपहरणाच्या घटना घडल्या हेही छापून येतं.

गुन्हा...आज गुन्ह्याचं स्वरुप व्यापक झालं आहे. त्यातच त्या गुन्ह्याअंतर्गत न्यायालयात नोंद होणारी प्रकरणं वाढत आहेत. आज न्यायपरिसरात थोडंसं जर फिरकलं तर एवढी भीड दिसते की ज्याबद्दल न सांगीतलेलं बरं. त्यातच एकदा का एखादा गुन्हा नोंद झालाच की बस पाच सात वर्ष काही पाहायची गरज नाही. तो गुन्हा जरी साधारण किरकोळ स्वरुपाचा असेल तरी त्या गुन्ह्याचा खटला हा किमान सात आठ वर्ष तरी चालतो. त्याहीपेक्षा कितीतरी जास्त दिवस. असे म्हणायला काही हरकत नाही.

अलीकडे विद्यार्थ्यांचे गुन्हेही नोंद व्हायला लागले आहेत. काही दैनिकाच्या अंकात छापून येतं की अवघ्या पाचच वर्षाच्या एका विद्यार्थ्याने आपल्या शिक्षीकेवर गोळी झाडली. यात विचार येतो की ते पाच वर्षाचं वय हे अतिशय कोवळं वय. त्या वयात तो विद्यार्थी गोळी झाडेलच कसा. त्याला तेवढी ताकद तरी असते का? विचार करायला लावणारा प्रश्न. कोणी विश्वासच करु शकणार नाही. परंतू सत्य सांगायचं म्हणजे असं घडू शकते. कारण आपल्याला कल्पना नसेल की ही कोवळ्या वयाचीही मुलं सपशेल खोटी बोलतात. ती शांत नसतातच मुळी. वर्गातही शांत बसत नाहीत. नेहमी

दंगामस्त्या करीत असतात. त्यांना कधी रागावलं तर महाभयंकर राग येतो. अशावेळी ते गुन्हा करु शकणार नाहीत हे कशावरुन? ते गोळीही झाडू शकतील. परंतू त्यांचं वय हे अति लहान असल्यानं तो घडलेला गुन्हा हा गुन्हा समजला जात नाही.

एक प्रसंग सांगतो. गावपरिसरात एक गुंड राहात होता. पुष्कळ धुमाकूळ घातला होता त्यानं. अनेक लोकं त्रस्त होते. त्याला कोणी खुलं मारु शकत नव्हतं. त्यातच गावानं ठरवलं, त्याला ठार करावं. परंतू करणार कोण? तो कोणाही सोबत फिरत नाही. एकटा कधीच नाही. मात्र त्याला सवय होती. तो लहान मुलांचा लाड करायचा. त्याला चॉकलेट चारायचा. हे गावकऱ्यांना माहीत होते. त्यांनी याचा फायदा घेतला व एका लहान मुलाला पटवलं.

तो लहान मुलगा. त्यानं त्याला चॉकलेट चार म्हणून दुकानात नेलं व तो दुकानदाराशी बोलू लागताच व बेसावध असतांनाच त्या मुलानं पाठीमागून त्याच्या डोक्यावर जोरात वीट मारली. त्याचबरोबर त्या गुंडानं तळपत आपलं डोकं पकडलं. तीच संधी पाहून अख्ख्या गावानं त्याला टोचून मारलं.

गुन्हे हे कधीकधी अनवधानानं घडतात. कधी सुनियोजीत पद्धतीनं. याबाबत बरेच प्रसंग सांगता येतील. जसे, एखादा व्यक्ती जर गाडी चालवत असेल आणि बोळीतून एखादा मुलगा धावत आला तर अपघात होणारच. अशावेळी हा झालेला अपघात हा अनवधानानं घडलेला असतो. तसंच एखादा प्रसंग असा घडतो की या प्रसंगात व्यक्ती आत्महत्या करतो. शेतकरी आत्महत्या हा प्रसंग अनवधानाच्या अपघातासारखाच नाही. तो सुनियोजीत असाच आहे. अशाचप्रकारे एखादे अपघात असे अनवधानानं तर काही सुनियोजीत पद्धतीनं होत असतात.

गुन्ह्याबाबत विचार करतांना आज महाविद्यालयीन मुलंही चाकू मारायला लागले आहेत. शाळेच्या आवारात एकतर्फी प्रेमातून होणारा हिंसाचार पाहता नेमकं शाळेतील शिकविण्यावर प्रश्नचिन्हं उभं होताना दिसत आहे.

आज गुन्ह्यांची श्रृंखला वाढलेली असून न्यायालयातील वाढलेल्या गर्दीवरुन नेमकं हेच निदर्शनास येतं की आज न्यायालयाला कोणीही घाबरत नाही. त्याचं कारण म्हणजे न्यायालयात कोणताही वाद सोडविण्यास लागणारा विलंब आणि दुसरा मुद्दा म्हणजे बचावपक्षाची असलेली भुमिका. बचावपक्ष हे चोर सोडून संन्याशाला फाशी देण्यागत वागत असल्यानं चोर निसटून जातो व संन्यासालाच फाशी होते. हे गुन्हे करणाऱ्या व्यक्तींना

माहीत असतं. म्हणूनच गुन्हे घडतात. आज गुन्हे घडतात तरुणपणात आणि त्याची न्यायालयात तपासणी होवून शिक्षा होते ती म्हातारपणात. प्रतिपक्ष वकीलांमार्फत तारीखवर तारीख मागीतली जाते. तसा वेळ वाया जातो. मग लोकं गुन्हे करणार नाही तर काय? इथे कसाबसारख्या आतंकवाद्यालाही न्याय मागण्यासाठी वकील मिळतो. काही वर्ष जगायला मिळतात आणि याकूबसाठी न्यायालय रात्री उघडतं. खरंच न्यायालयातील याच धोरणामुळं गुन्ह्यांची संख्या वाढणार नाही तर काय? ती वाढेलच आणि मिडीयावाल्यांना बातम्या मिळेलच.

गुन्हे संपू शकतात. न्यायालयातीलही गर्दी कमी होवू शकते. काही गोष्टी केल्या तर.

१) न्यायाधीश महोदयांची संख्या वाढवावी. कारण अलीकडे न्यायालयात न्यायाधीशाची संख्या कमी आहे. ती वाढवायला हवी.

२) न्यायालयात खटल्याला जो विलंब होतो, तो कमी करायला हवा.

३) ज्या न्यायालयांना सुट्ट्या असतात, त्या कमी करायला हव्या.

४) मिनी न्यायालय गावागावात स्थापन व्हावं. जसं ग्रामपंचायतीला न्याय देण्याचे पॉवर द्यावेत. तसेच वार्डावार्डामध्येही मिनी न्यायालय स्थापन व्हावे. या ग्रामपंचायत स्तरावर किरकोळ गुन्ह्यांना न्याय मिळावा तर थोडे

गंभीर गुन्हे पोलीस स्टेशनला सोडवले जावेत. त्यानंतर जास्त गंभीरतेचे गुन्हे न्यायालयात.

५) बचाव पक्षांना जास्त संधी देवू नये.

६) गुन्ह्याची पडताळणी पोलिसांनी जरी पुर्ण केलेली असली तरी केवळ न्यायालयातच त्याची तपासणी करु नये. तो गुन्हा तद्नंतर ती केस बोर्डावर आल्यावर प्रत्यक्ष त्या स्थळी जावून तपासावा व दोष आढळल्यास कडक शिक्षा द्याव्यात. कारण पुरावे जरी प्रत्यक्ष स्थळावरुन मिटवले गेले तरी कोणतेही गुन्हे हे प्रत्यक्ष स्तरावर एक ना एक पुरावा सोडत असते.

७) ग्रामपंचायत किंवा वार्डामध्ये जो व्यक्ती न्यायदान करीत असेल आणि त्या ठिकाणी समाधान न झाल्यास वा खालच्या न्यायालयात समाधान न झाल्यास व्यक्ती न्याय मागायला वरच्या कोर्टात जातात. याचा अर्थ असा धरु नये की त्यांना न्यायदान जमत नाही. ते साक्षी पुरावे पुढील न्याय देण्यासाठी ग्राह्य धरावे.

८) खटल्याची वर्गवारी करावी व प्रत्येक खटल्यासाठी वेळमर्यादा ठरवावी.

९) समजा एखाद्या गावात किंवा वार्डानं एखाद्या व्यक्तीस शिक्षा दिल्यास ती शिक्षा ग्राह्य धरुन त्या गुन्हेगारास शिक्षेसाठी बाहेर गावात

पाठवावे. त्याची बाहेर गावात व्यवस्था करावी. गावात व्यवस्था असू नये. अशांच्या कुटूंबांना गावानं वाळीत टाकावं. जेणेकरुन गावातील कोणताही व्यक्ती गुन्हे करणार नाही. तीच बाब वार्डामध्येही असावी. तसेच अशा वाळीत टाकलेल्या व्यक्तींशी कोणी संपर्क ठेवत असेल तर त्यालाही शिक्षेचं प्रावधान असावं.

१०) मुख्य म्हणजे वार्डामध्ये वा गावात न्यायदान करणारा व्यक्ती हा गावातील नसावा. तो बाहेरुन आलेला असावा व त्याला गावात जास्त दिवस ठेवू नये.

११} विशेष सांगायचं म्हणजे शिक्षा ह्या सौम्य नसाव्यात. त्या गुन्ह्याच्या प्रकारानुसार कडकच असाव्यात.

मुख्य सांगायचं म्हणजे गुन्ह्याची संख्या कमी होवू शकते. परंतू वरील गोष्टी घडायला हव्यात. वरील गोष्टी जेव्हापर्यंत घडणार नाहीत. तेव्हापर्यंत गुन्हे घडतच राहतील व गुन्ह्यांची संख्या वाढतच राहील व न्यायालयातही भीड लागतच राहील हे तेवढंच खरं आहे.

**********************

देवांशू पुस्तकं लिहित होता. त्याचबरोबर त्याचे धडाडीचे लेखही वर्तमानपत्रात येत होते. तो चांगले चांगले विचार मांडत होता वर्तमानपत्रातून. त्याला ती रियाची तक्रार माहीत असल्यानं तो आता टोपणनावानंही लेख लिहीत होता आणि पुस्तकं प्रकाशीत करीत होता. आज तो नावारुपाला आला होता.

देवांशूची पुस्तकं निघत असल्यानं देवांशूला आज मोल आले होते. त्यातच आता त्याला लोकं भेटू पाहात होते. तो भेटायचं झाल्यास लोकांना एखाद्या हॉटेलात भेटत असे. परंतू ते बरं वाटत नव्हतं.

देवांशूनं आता ठरवलं होतं की आपण घर बांधावं. परंतू बांधणार कसं? जवळ पैसा नव्हताच. शेवटी त्यानं एक किरायाचा कमरा घेतला आणि तो त्यात वास्तव्य करुन राहू लागला.

देवांशूचा तो किरायाचा कमरा...तो किरायाचा कमरा का असेना, देवांशू त्या कमऱ्यात स्थावर झाला होता. तसं पाहता देवांशू आता प्रसिद्धीच्या उंबरठ्यावर होता.

देवांशूची प्रसिद्धी. त्यातच त्याचं लिखाण. ते पाहता त्याला पुरस्कार मिळणं आवश्यक बाब होती. परंतू तो पुरस्कार मिळवणार कसा? त्याला ती रियाची तक्रार आठवत होती.

देवांशूनं आज स्मार्टफोन विकत घेतला होता. तसं त्याला करमत नव्हतं. कधी वाटत होतं की आपणंही मोबाईलवर बोलावं. परंतू बोलणार कसं? मागं असंच दुसऱ्याच्या मोबाईलवरुन बोलतांना तो फसला होता. त्याच मोबाईलवरुन बोलण्याचं कारण त्याच्या विरोधात तक्रार दाखल झाली होती. रियानं दाखल केली होती. म्हणून की काय, त्यानं मोबाईल घेतला खरा. परंतू बोलण्याची हिंमत होत नव्हती. त्याला आजही वाटत होतं की अशीच आणखी दुसरी कोणी रिया माझ्या जीवनात येवून मला फसवेल. यासाठी की काय, तो मोबाईलवर कुणाशी बोलत नव्हता.

एकदाचा तो दिवस. देवांशू व्हाट्सअप पाहात असे. असाच तो एकदा व्हाट्सअप पाहात असतांना त्याच्या मोबाईलवर हाय लिहिलेला संदेश आला. त्यानं तो संदेश वाचला व पुष्टी करण्यासाठी त्यानं कोण? असा परत संदेश पाठवला. त्यातच तिकडून उत्तर आलं. "मी मोनीका."

"मोनीका कोण?"

"मी आपली एक वाचक. मला आपले लेख आवडतात. तुमचे ते लेख छान असतात."

"हो काय, धन्यवाद." तो म्हणाला.

देवांशूचं तसं बोलणं. त्यावर ती म्हणाली,

"आपण मैत्री करुया का?"

"नाही. अजिबात नाही."

"का बरं?"

"नाही सहजच."

"काही चुकलं का माझं? काही चुकलं असेल तर मला चूक कळू द्या. स्पष्टपणे सांगा. हवं तर मी... मी माफी मागते. तसं पाहता मी माफीच्या लायक नाही. कारण मीच तुम्हाला संदेश टाकला."

"नाही तसं नाही. परंतू मैत्री संदर्भात माझ्याशी एक गैरप्रकार घडला."

"जरा कळेल काय मला."

"नको. राहू दे."

"सांगीतल्यानं मन हलकं होतं. जरा सांगा प्लीज."

"नको. राहू द्या."

"नाही. मलाही कळू द्या. मैत्री कशी वाईट असते. आपण लेखक आहात ना. मग लेखकाचं कामच असतं मार्गदर्शन करणं. आपण फक्त मला मार्गदर्शन करा."

मोनीका ती. ती जोर देत होती त्या विषयावर. शेवटी न राहवून तो सांगू लागला तिला आपली कर्मकहाणी. जी त्याचेसोबत घडली होती.

"मी लहान होतो. आम्ही सात भावंडं. आम्ही मजेत राहात होतो. आमची शेती होती. त्या शेतीवर जात होतो. माझे वडील राबत होते शेतात आणि आम्हाला पोषत होते. तसं पाहता आम्हाला अन्न पोटभर मिळायचं नाही. म्हणून आम्ही शेतावर कधी खेकडे पकडायचो तर कधी रानात रानमांजरी. ते आमचं अन्न होतं. त्यावर आमचा उदरनिर्वाह चालायचा. आम्ही कधी किड्या मुंग्यांवर जीवन काढलं. कारण आम्हाला खायलाच मिळायचं नाही.

मी जेव्हा सात वर्षाचा झालो ना, तेव्हा माझ्या वडीलांनी मला शाळेत टाकलं. शाळेतील बाई छान छान शिकवायची. ते शिकवणं आवडायचं मला. आनंद वाटायचा. त्या ज्ञानानुसार वागावसं वाटायचं.

एकदाचा प्रसंग. आम्हाला बाईंनी शिकवलं होतं की मांस खावू नये. पाप होतं. ते निष्पाप जीव असतात. त्यांची हत्या करु नये. त्यानुसार मला नंतरच्या काळात मांस खाण्यावरून किळस यायची. ते पाहून मी मांस खात नव्हतो आणि मी रानातील ती मांजरही पकडत नव्हतो. मासेही आणि खेकडेही पकडत नव्हतो. कारण मला आता बाईच्या म्हणण्यानुसार त्यांना पकडणे व खाणे पाप वाटत होतं. वाटत होतं की आपण त्यांना खातो, म्हणजे जीव हत्याच करतो.

तसं मला वाटताच मी मासे पकडायला नकार दिल्यानं माझ्या वडीलांना ती गोष्ट खटकत होती म्हणून की काय ती गोष्ट विचारात घेऊन माझ्या वडीलांनी मला शाळेतून काढलं नव्हे तर मी काही कामाचा नाही म्हणून मला विकून टाकलं होतं.

मला श्रीधर नावाच्या माणसाने विकत घेतलं. त्यानं मला जेवन तर दिलं. परंतू त्यानं मला अति त्रास दिला. तो मला गुलामासारखा वागवत असे. माझ्याकडून आपले पाय चेपून घेत असे. मिही आळस न करता त्यानं सांगितलेले सर्व काम न चुकता करीत असे. तसा तो एकदाचा प्रसंग घडला.

माझा मालक म्हणजे श्रीधर घरी नव्हता. त्यावेळी अचानक एक कॉल आला व मी बोलायला लागलो. तशी पुढील व्यक्ती म्हणाली,

"हैल्लो, मी रिया बोलतेय."

"बोल, कोण हवंय तुला?"

"तू एकटाच घरी आहे ना."

"होय. मी एकटाच घरी आहे. का बरं?"

"तू देवांशू बोलत आहे ना."

"होय मी देवांशूच. का बरं."

"मला बोलायचं आहे तुझ्याशी. बोलते ना."

"होय बोलते."

"मला मैत्री करायची तुझ्याशी. बोल करशील ना."

"होय करेल."

"पण मला मोबाईलवर बोलणं आवडते. बोल, बोलशील ना."

"होय, बोलेल. परंतू हा फोन माझा नाही. हा फोन दुसऱ्याचा आहे."

"ठीक आहे. तुला जेव्हा सवड मिळेल, तेव्हा बोलशील माझ्याशी. तूच फोन लावशील मला."

"ठीक आहे." असं म्हणत तिनं फोन ठेवला.

मिही तरुणच होतो. मी रियाशी बोलत असे. श्रीधर घरी नसला आणि त्याचा फोन घरी असला की मी त्याच फोनवरुन रियाला फोन लावत असे. तसा तो त्या दिवशीचा प्रसंग. रियाचा मला फोन आला होता. तिचं ते बोलणं.

"व्हिडीओ कॉल कर. मला तुझ्याशी व्हिडीओ कॉलवर बोलायचं आहे. तुला पाहायचं आहे मला."

"का बरं?"

"तुला बोलायचं नाही का?"

"बोलायचं आहे."

"मग कर ना व्हिडीओ कॉल."

तो रियाचा फोन. त्यातच तिला मी व्हिडीओ कॉल केला. त्यातच त्या व्हिडीओ कॉलवर तिकडून ती रिया नावाची मुलगी बोलू लागली. तीच संधी साधून तिचं माझ्यासोबतचं अश्लीलतेनं संभाषण. त्यातच माझंच ते वय. ते वयच तसं होतं.

रिया नावाची ती मुलगी. त्या मुलीनं ऑनलाईन फोन लावला मला नव्हे तर व्हिडीओ कॉल केला. तसं पाहता तिनं अश्लीलतेचं प्रदर्शन केलं. त्यानंतर तिनं ते अश्लीलतेचं प्रदर्शन रेकॉर्डींग केलं.

थोड्या वेळाचा अवकाश. त्यातच त्या श्रीधरच्या मोबाईलवरच व्हाट्सअपवर एक व्हिडीओ क्लीप आली. त्या क्लीपमध्ये पुर्णपणे माझ्या नग्नपणाचं चित्रीकरण होतं व थोड्याच वेळात फोन आला व फोनवर धमकी आली की मी व्हिडीओ कॉलवर अश्लील प्रदर्शन केलं आहे. त्याचा मुआवजा तिला द्यावा. नाहीतर ती माझी तक्रार पोलिसांना करणार आहे.

मी पुरता घाबरलो. तसं पाहता मी श्रीधरच्याच घरी राहात होतो. त्यानं दिलेल्या तुकड्यावर मी लहानाचा मोठा होत होतो. मी त्याचा जणू गुलामच होतो आणि गुलामाला कोणतीच अब्रू नसते असं मला तिथं वागवत होते.

आज मला आलेली ती रियाची धमकी. त्यातच घाबरुन गेलेला मी. मी त्या मोबाईल कॉलवर खरी खरी माहिती रियाला दिली. त्यात मला तसं काही होणार याची माहिती नव्हती. परंतू तसा अब्रूनुकसानीचा मेसेज व कॉल येताच मी घाबरलो व मी तो कॉल पुन्हा येवू नये म्हणून तो मोबाईल नंबर ब्लॉक केला.

मोबाईल क्रमांक ब्लॉक केला खरा. परंतू त्या फोनवर तिचे फोन वारंवार येवू लागले. त्यातच ती गोष्ट श्रीधर बोलतो असे सांगताच ती बोलायची नाही. कधीकधी श्रीधर घरी नाही असं पाहून ती बोलायची. त्यातच मला धमकीही द्यायची. तशी ती गोष्ट एक दिवस श्रीधरला माहीत झाली व श्रीधरनं मला घरातून हाकलून दिलं.

मला श्रीधरनं घरातून हाकलून दिलं. परंतू रियाचा फोन काही पिच्छा सोडत नव्हता श्रीधरचा. अशातच एक दिवस श्रीधर म्हणाला रियाला की अशी धमकी देण्यापेक्षा तिनं माझी तक्रार पोलीसस्टेशनला टाकूनच द्यावी. त्याच धमकीच्या अनुषंगानं आज रियानं ती माझी व्हिडीओ क्लीप जोडून पोलीसस्टेशनला तक्रार दाखल केली होती व पोलीस त्या तक्रारीनंतर मला शोधत फिरत होते. श्रीधरच्या बापाचं काय जाणार होतं. रियाला तक्रार टाक म्हणतांना. गेलं ते माझंच ना.

मी सेक्सटार्शनचा बळी ठरलो होतो. नकळत माझ्या हातून चूक घडली होती व रियानं ती तक्रार पोलिसांना केली होती व पोलीस माझा शोध घेत होते. आजही शोधत आहेत मला आणि मी आपला जीव लपवत फिरत आहे.

मोनिकानं सर्व कहाणी ऐकली. तिला फार वाईट वाटले. तसं तिनं दाखवलं. तशी ती म्हणाली,

"अशी आहे तुमची कहाणी तर...परंतू चिंता करु नका. मी तुम्हाला काहीही करणार नाही याची खात्री ठेवा. मला तुमच्याकडून काही मिळवायचं नाही. माझी तशी अपेक्षा देखील नाही."

मोनिका बोलून गेली खरी. तशी ती चांगली होती. तिला कशाची अपेक्षा नव्हती. ते तिचं बोलणं त्याला सत्य वाटलं. तसा तो तिच्याशी बोलायचा होकार देत तिच्याशी बोलू लागला नेहमीसारखा. परंतू आता तो आवर्जून काळजी घ्यायचा की ती फसवणार तर नाही.

देवांशू व्हिडीओ कॉलवर बोलत नव्हता तिच्याशी. कारण त्याला भिती होती की ती त्याला फसवून टाकेल. तसा तो तिच्याशी रेकॉर्डींग कॉलवरही बोलत नव्हता. तसाच तो तिच्याशी अश्लीलतेनं संभाषण करीत नव्हता.

एकदाचा तो दिवस. मोनिका म्हणाली,

"मला तुम्हाला पाहायचं आहे. कसे दिसता याचं आकर्षण आहे. परंतू तुम्ही माझ्याशी व्हिडीओ कॉलवर बोलू शकणार नाही. परंतू मला पाहायचं आहे तुम्हाला. त्यामुळं भेटायचं आहे. भेटाल का?"

"होय, का नाही भेटणार. तू सांग. मी भेटायला येतो. परंतू एक की तू काही वात्रट गोष्टी करु नये म्हणजे झालं."

मोनिकानं त्याला आश्वासन दिलं. तसा तो तिला भेटायला गेला.

ती भेट. त्यातच तो त्या भेटीदरम्यान म्हणाला,

"मला तू अहो जावो म्हणत जावू नकोस."

"ठीक आहे." ती म्हणाली.

मोनिका भेटली खरी त्याला. त्याला अगदी हायसं वाटत होतं. त्याला आनंद वाटत होता. कारण त्याला असं कोणी आपलं म्हणणारं आजपर्यंत कोणीच भेटलं नव्हतं. असं वाटत होतं त्याला.

मोनिकाची त्याची ओळख झाली होती. तसं त्याचं तिच्याशी बोलणं झालं होतं. त्यानंतर ते एकमेकांशी बोलत राहिले. कधी फोनवर तर कधी असेही. त्यामुळं की काय, आता मोनिकाची भीती वाटत नव्हती त्याला. तो अगदी बिनधास्त होवून बोलत होता.

मोनिकाशी देवांशूचं प्रेमानं बोलणं. त्यातच मोनिकाची वारंवार देवांशूशी होत असलेली भेट. त्यांच्यात प्रेम निर्माण करणारी गोष्ट होती. ते आता एकमेकांवर प्रेम करु लागले होते. अशातच एक दिवस देवांशूला तिचा फोन आला.

"मला तुम्हाला भेटायचे आहे. बोला, भेटाल का?"

"होय, का नाही भेटणार."

मोनिकाची मैत्री. त्यातच तिच्यावर असलेला विश्वास. त्यांची फुलत चाललेली मैत्री. आज एकमेकांवर जीवापाड प्रेम करणारे ते. त्याला ती विश्वासघात करेलच असं वाटत नव्हतं. कारण तिही गोड गोड बोलत होती.

ती भेटायला आली. तसा तोही. त्यातच त्यांचं संभाषण सुरु झालं. संभाषणात बोलता बोलता ती म्हणाली,

"मला तुझ्याकडून दरमहा महिना हवाय."

"का? मी असा कोणता गुन्हा केलाय."

"गुन्हा! तू फार मोठा गुन्हेगार आहेस. मला बोलावलं. फिरवलं. बोल मी फिरले की नाही तुझ्यासोबत."

"होय. फिरली तू. परंतू त्याचे एवढे पैसे?"

"होय. का? मी रिकामी होती का तुझ्यासोबत फिरायला. मला काही कामधाम नव्हते का?"

मोनिकानं विचारलेले प्रश्न, त्याच्या काळजाला भिडले होते. आज तो तिला भेटण्यापुर्वी अतिशय आनंदी होता. परंतू आताच्या तिच्या बोलण्यानं त्याच्या आनंदावर विरजण पडलं होतं. तो आनंद पार दुःखात मिसळून गेला होता. त्यात आता तीळसंक्रांतीचा तिळगुळ नव्हता.

तो गप्प होता काहीवेळ. ते पाहून मोनिका म्हणाली,

"आता बोल ना. आता गप्प का? तुला फिरायला लय मजा आली तेव्हा आणि आता पैसे म्हटले तर गप्प झाला. अरे मुलीचं जीवन का असंच असतं का? कोणीही चाल म्हणावं आणि त्याचेसोबत फुकटात फिरावं."

" मी थोडं ना चाल म्हटलं फिरायला. तूच नेलं ना फिरायला."

"आता एक शब्दही बोलू नगंस. फक्त एक सांग की तू पैसे देणार की नाही."

"काय करणार."

"काय करणार म्हणजे?"

"काय करणार, नाही पैसे दिले तर..."

"काय करणार म्हणजे? अरे पोलिसात जाईल. तुझी बदनामी करील. तू लेखक आहे ना. महान लेखक. तुझी प्रतिष्ठा धुळीस मिळवील."

"जा मिळव. माझ्याकडे नाही आहेत पैसे. माझा गुन्हाही नाही तरी छळ करतेस माझा. हा स्री अत्याचार आहे माझ्यावर."

"तुझ्यावर...तुझ्यावर माझ्या एकटीचाच स्री अत्याचार. अन् ती रिया कोण होती. तिच्यावर अत्याचार झाला नाही का तुझा. अरे लोकं का फालतूच केस टाकतात का? तिनंही टाकली ना केस."

"ते गडलेले मुदडे कशाला काढतेय. तुला माहीत आहे का रियाचं प्रकरण. काय झालं ते तरी माहीत आहे का? त्यात माझा गुन्हा तरी होता का? अगं एक फोन आला. मग मिही बोललो त्या फोनवर. बस एवढाच माझा गुन्हा. फोनवर बोलणं हाच गुन्हा झाला माझा."

"हो का? तू जसा साधाच बोलला होता की नाही तिच्याशी. तूला अश्लील बोलायला कोणं सांगीतलं होतं. तो गुन्हा नाही का तुझा?"

"हो, तेवढीच एक चूक झाली. परंतू तिनं बाऊ केला त्या प्रकरणाचा. अन् पैसे कमविण्यासाठी तिनं ती केस टाकली."

"मला तिचं काही करायचं नाही. मला एवढंच माहीत आहे की मी तुझ्यासोबत एवढी फिरली. तुला फिरतांना मजा आली. आता मला दरमहा

पैसे हवेत. नाहीतर मी पोलिसात तुझी तक्रार करतो. मंजूर असेल तर सांग. नाहीतर मी मोकळी पोलीसस्टेशनला जायला."

"काय पुरावा आहे की मी फिरलो तुझ्यासोबत."

"पुरावा म्हणजे? अरे फोटो आहेत तुझे त्या स्पाॅटवर काढलेले माझ्यासोबतचे. अन् रेकॉर्डींगही आहे तुझ्यासोबतच्या बोलण्याचे. त्यात रियाचीही तक्रार पोलीसस्टेशनला सुरु असल्याचे सांगितले आहे तू. सगळं आधीपासूनच रेकॉर्डींग केलं मी. ती अश्लीलताही रेकॉर्डींग करणार होते मी. परंतू तू फसला नाही त्यात. तिच माझी चूक झाली तेवढी."

मोनिका बोलत होती. तसा तो पुरता घाबरला होता आतून. परंतू हिंमत करुन तो उत्तरं देत होता. त्याचा गुन्हा नव्हता ना त्यानं तिला लाईक केलं होतं. तिनंच त्याला लाईक केलं होतं व दोस्तीही. तिनंच फिरवलं होतं त्याला आणि सगळं रेकॉर्डींगही करुन ठेवलं होतं. तो मात्र साधाभोळाच वागला होता तिच्याशी. कारण त्याला त्या गोष्टीची कल्पना नव्हती.

दोन्ही प्रकरणं. दोष नसतांना तो फसला. असं त्याला मनोमन वाटत होतं. बाकीची काही मंडळी अख्खं कांड करुन टाकतात. परंतू त्या गोष्टीची कल्पना कोणालाही येवू देत नाहीत. अन् मी साध्या गोष्टीनं फसलो. नाही

आता साधं राहायचं नाही. जाईल तर जावू दे पोलीसस्टेशनला. पाहून घेवू. कुठंपर्यंत घाबरत राहायचं आपण."

तो तसा विचार करु लागला व शेवटी म्हणाला,

"जा. तुही टाक तक्रार पोलीसस्टेशनला रियासारखीच. टाकून दे तुही केस."

मोनिकानं ते त्याचं बोलणं ऐकलं. तिला वाटत होतं की आपण जर देवांशूला तसं बोलू तर तो घाबरेल व मला दरमहा पैसे देईल व मला बसून खाता येईल. तसंच मजाही उडवता येईल.

मोनिकाचा तो विचार. त्यांचं ते बोलणं. ती निघून गेली होती.

ती निघून गेली. परंतू निघून गेल्यावर ती सरळ घरी गेली नाही. ती पोलीसस्टेशनला गेली. कारण तिला पैसे कमवायचे होते त्याच्याकडून. त्यामुळं त्याला त्रास देणं बंधनकारक होतं.

तिनं ती त्याची तक्रार पोलीसस्टेशनला दिली. तसा त्याचा फोननंबरही दिला तिनं पोलीसस्टेशनला आणि ती घरी निघून गेली.

देवांशू साधा भोळा मुलगा होता. परिस्थितीनं गांजलेला. लहानपणी त्याला मायबापानं विकून टाकताच त्याच्या अंगाखांद्यावरुन मायबापाचा आधार निघून गेला होता. त्यानंतर तो वाढला त्या श्रीधरच्या आधारानं.

त्यानंही त्रास देत देत त्याला वाढवलं होतं. कधी उपाशी राहून तर कधी शिळं पांत खावून तो लहानाचा मोठा झाला. त्यातच ते दुधाचे ओठ सुकताच त्याच्या मागं लागली रियाची तक्रार. त्यातच श्रीधरनं हाकलून दिलं त्याला घरातून. शेवटी तो रस्त्यारस्त्यावर राहिला भीक मागत अन् भीक मागत मागत जगला. लपत राहिला रियाची केस अंगावर येईल म्हणून. या शहरातून त्या शहरात. शेवटी तेच झालं. मोनिकानं त्याच गोष्टीचा गैरफायदा घेतला. यावेळी गुन्हा तिनंच केला आणि थोपवला त्याचेवर.

ती नियती कसली निष्ठूर होती. ती कर्म करुन घेत होती त्याचेकडून. तो चांगले कार्य करीत होता लेखन करुन. तो आपल्या लेखनीनं समाजाला जागृत करीत होता. परंतू नियती त्याच्या मागं कधी रियाची तर कधी मोनिकाची तक्रार लावत होती.

रियाचा आधार देत मोनिकानं त्याची तक्रार पोलीसस्टेशनला दाखल केली आणि ती घरी निघून गेली. तसे दोनतीन दिवस निघून गेले. तोच दोनतीन दिवसानंतर त्याचा फोन खणखण वाजला. तसा तो बोलला,

"हैल्लो, कोण?"

"मी पोलीस सब इनस्पेक्टर. अमूक अमूक पोलीसस्टेशनमधून बोलत आहे."

"बोला साहेब."

"आपण देवांशू का?"

"होय."

"आपण मोनिकाला ओळखता का?"

"होय, का बरं?"

"तक्रार आहे तिची तुमच्याविरोधात."

"कशाची?"

"तुम्ही पोलीसस्टेशनला या. सगळं सांगतो."

"ठीक आहे साहेब." तो म्हणाला व त्यानं फोन ठेवला.

देवांशूला आलेला पोलिसांचा फोन. मोनिकानं केस दाखल केली होती पोलीसस्टेशनला. त्यातच आता तो पुरता घाबरला होता. काय करावं सुचत नव्हतं. मोनिकाची ओळख होताच नुकतंच त्यानं घर बांधलं होतं. त्यालाही वाटत होतं की आपलं आता वय होत आहे. आपण मोनिकाशी विवाह करावा व सुखानं जगावं. त्याला काय माहीत होतं की तो जे विचार करीत आहे, त्याच्या अगदी उलट होईल. तिनंही आपल्या डोळ्यातून पाणी हालू दिले नव्हते.

ज्यावेळी शेवटच्या दिवशी तिनं त्याला भेटायला बोलावलं होतं, त्यावेळी त्यानं विचार केला होता की आज तो तिला विवाहाविषयीचं बोलेल. विचारेल की आपण केव्हा विवाह करायचा. परंतू तिनं ती गोष्ट न करता भलतीच गोष्ट केली होती आणि आज तर त्याची तक्रारच टाकून दिली होती पोलीसस्टेशनला.

तो दिवस तसाच गेला. तसा तो दिवस जाताच देवांशू सकाळीच उठला. त्याला पोलीसस्टेशनला बोलावले होते मोनिकाच्या केसबद्दल.

देवांशू सकाळी उठला. त्यानं प्रातःविधी आटोपवला व तो पोलीसस्टेशनला जाण्यासाठी तयार झाला. थोड्याच वेळात तो पोलीस स्टेशनला पोहोचला. त्यावेळी अनंत विचार होते.

"काय नाव तुमचं?" एक पोलीस शिपाही म्हणाला.

देवांशूनं त्याला आपलं नाव गाव सांगीतलं. तशी सर्व इत्यंभूत माहिती सांगीतली व काय काय घडलं तेही सांगीतलं. त्यावर पोलीसवाले म्हणाले,

"मिस्टर, तुम्ही अगदी निष्कलंक असाल. तरीही आता ही केस नोंद झाली ना. त्यामुळं आपणाला अटक करावीच लागेल तुम्हाला. कारण ही एका महिलेची तक्रार आहे. ही काही साधी सुधी तक्रार नाही. आपल्यावर

फौजदारी कारवाई करावीच लागेल आम्हाला. आपण हवं तर एखादा साक्षीदार आणा."

"साहेब, या जगात माझं कोणीच नाही. शिवाय मला या केसमध्ये फसवलं गेलं आहे."

"ते काही आम्ही जाणत नाही. तुम्ही हवी तर न्यायालयात दाद मागू शकता."

पोलिसांचं ते बोलणं. देवांशू चूप बसला. त्या पोलिसांसमोर तो निर्दोष असला तरी त्याचं काही चाललं नाही. शेवटी तो हताश झाला व त्याला त्या पोलिसांनी त्याचा गुन्हा नसतांनाही अटक केली.

देवांशूला पोलिसांनी अटक केली होती. अटकेनुसार त्याला दुसऱ्या दिवशी न्यायालयात सादर करण्यात आलं व त्याच्याकडे जमानतदारही नसल्यानं त्याची रवानगी तुरुंगात झाली व तो गुन्हेगार नसतांनाही त्याला जाणूनबुजून जबरदस्तीनं शुल्लक चुकीनं गुन्हेगारांच्या रांगेत बसवलं गेलं.

**********************

तो तुरुंग अगदी भयावह वाटत होता. त्याच्या चारही बाजूला भिंती होत्या. कोपऱ्यात एक दरवाजा होता. त्याला बराक असे म्हणत. तो मोठा सभागृहच होता. त्या सभागृहात जनावरं जशी कोंडतात, तसं माणसांना कोंडलं गेलं होतं. सायंकाळच झाली होती. तशी देवांशूची रवानगी त्या कारागृहात झाली.

तो कारागृह...देवांशू जेव्हा तिथं गेला. तेव्हा कैद्याचं जेवन आटोपलं होतं. भूक फारच लागली. तसा दिवसभर अन्नाचा कण पोटात नव्हता. त्यामुळं देवांशूला भूक लागली होती. परंतू जेवन कुठून मिळणार देवांशूला. देवांशू अन्नाच्या तडफेनं एका कैद्याला म्हणाला,

"मला भूक फार लागली आहे." परंतू त्यावर तो कैदी म्हणाला,

"तू काय माझ्या घरचा पाहूणा आहेस का की तू मला सांगून पाठवले होते की मी येणार. जेवन बनवून ठेव."

ते त्या कैद्याचे उलट उत्तर. देवांशूला राग येत होता. परंतू तो काय करणार. आता उपाय नव्हता त्याचेजवळ. त्याला नियतीचा राग येत होता आणि त्याचबरोबर त्या मोनिकाचाही राग येत होता. जिनं त्याला फसवलं होतं. केवळ फिरायला नेल्याचं निमित्य करुन तिनं पैसा मागीतला होता आणि तिला तो पैसा न दिल्यानं तिनं ती केस टाकली होती.

ती रात्र...ती रात्र त्यानं उपासातच काढली. रात्रभर त्याला झोप आली नाही. ते थंडीचे दिवस असल्यानं व अंगावर पुरेसं ब्लँकेट नसल्यानं थंडी वाटत होती. त्यातच आजुबाजूचे चिलटं रक्त प्राशन करण्यासाठी दंश करीत होते. तसा त्याला विचार आला की ही चिलटं आणि मानवात काय फरक आहे. ही चिलटं आपलं पोट भागविण्यासाठी माणसाला दंश करतात व माणसाचं रक्त पितात. तशी ती माणसं आपलं पोट भागविण्यासाठी माझ्यासारख्या कित्येक निरपराध माणसांना पैसा मागतात जाळ्यात फसवून. म्हणूनच खुन होत असावेत. कदाचीत वैषम्य तर वाटू नये की मी गुन्हा केलेला नाही आणि फुकटच शिक्षा भोगतोय. आज मला तेच वाटत आहे. जर मी गुन्हा केला असता तर मला ही जी शिक्षा झाली. त्याबद्दल दुःख वाटलं नसतं. खरं तर अशांना ठेचूनच मारलं पाहिजे.

त्याचा तो विचार. त्याला भयंकर राग आला व रागाच्या भरात तो स्वगत म्हणाला,

'काय ही चिलटं. ही चिलटं माझं रक्त पितात. जा म्हणावं त्यांच्याकडे अन् पी म्हणावं त्यांचं रक्त. ज्यांनी मला इथं पाठवलंय.'

त्याला त्या डासांचा भयंकर राग आला. तसं त्याला त्या डासाचा राग येताच त्या डासाला त्यानं पटकन मारलं व आपला तिच्यावरील राग त्यानं डासावर काढला.

तो तुरुंग. त्या तुरुंगात काही एकच डास नव्हता, अनेक डास होते त्या तुरुंगात. एक डास रागाच्या भरात मारला होता त्यानं. परंतू अनेक डास चावत होते त्याला. तो तरी कोणाकोणाला मारणार. तसा त्याला विचार आला की समाजातही असे अनेक डास आहेत की जे असेच चावतात माणसाला. माणसाचा गुन्हा नसेल तरी. तेच या डासांसारखं सारखं रक्त पीत असतात माणसाचं. असे डास आज माणसाला छळत असतात.

ते डास रात्रभर चावत होते त्याला. तशी त्याला बरोबर झोपही येत नव्हती. वरुन थंडीही होती. त्यामुळं रात्र कुडकुडत काढावी लागत होती. त्यातच सकाळी पहाटेला झोप लागली.

ती पहाटेची वेळ. रात्री उशिराच झोप लागल्यानं पहाटेला अति गाढ झोप डोळ्यात होती. तशी घंटा झाली व सगळी मंडळी झोपेतून खडबडून जागी झाली. उठून बसली. परंतू देवांशू काही उठून बसला नाही. त्याला सवय नव्हतीच. तसा एक तुरुंग अधिकारी तेथे आला. त्यानं पाहिलं की देवांशू झोपलेला आहे.

देवांशूला झोपलेला पाहून त्याला उठवण्यासाठी तो तुरुंग अधिकारी आला. त्याच्या हातात चैन होती. त्यानं ती चैन अति जोरात देवांशूच्या पाठकाडात मारली व देवांशू काय झालं म्हणून खडबडून जागा झाला. त्यानं पाहिलं की त्याच्या पुढ्यात तो तुरुंग अधिकारी साक्षात उभा आहे.

सर्वजण उठले होते. सर्वांनी आपआपली अंथरुणं गोळा केली. त्याचबरोबर एक रांग लावली गेली. देवांशूही रांगेत लागला. कोणीतरी म्हणत होतं, गिणती होणार. तोपर्यंत बसायचं आहे. सगळेजण अगदी शांततेत बसले होते. सगळ्यांना सकाळी जवळपास एकदोन तास शांततेत बसावं लागतं हे देवांशूला माहीत नव्हतं. तो झोपेतून उठला तर खरा. परंतू तो रांगेत बसला असतांना पाठीमागच्याशी बोलत होता. तोच अजून एक तुरुंग अधिकारी आला व त्यानं परत पाठीवर ती चैन मारली व खुणेनंच सांगीतलं की बोलायचं नाही.

देवांशूला ती चैन बसताच तो काय समजायचं ते समजला. त्याचाही जीव तळमळला होता. कारण ते थंडीचे दिवस होते आणि थंडीच्या दिवसात मार हा जोरात झोंबत असतो. परंतू त्या तुरुंग अधिकाऱ्यांना कोण सांगणार.

सकाळचे सात वाजले होते. तसं बाहेर उजाडलं होतं. त्यातच गिणती सुरु झाली. देवांशूनंही आकडा म्हटला जोरात. त्याचबरोबर गिणती पुर्ण झाली व गिणती पुर्ण होताच तुरुंगाचं दार उघडलं व सर्वजण बाहेर पडले.

बाहेर शौचालय होतं. ते शौचालय स्वच्छ नव्हतं. ते शौचालय...ती कैदी मंडळी तुरुंगाच्या त्या काल कोठडीतून बाहेर पडताच शौचालयात गेली. तिथंही त्यांनी राग लावली. परंतू नंबर लागत नव्हता. अशातच सकाळचे नऊ वाजत आले होते. तोच आवाज आला. नावाचा तो पुकारा. 'देवांशू हजर आहे का? बोलावलंय.'

देवांशूनं शौचालयात नंबर लावला होता. आता त्याचा नंबर लागणार. तोच आवाज आल्यानं तो शौचालयात गेला नाही. तो परत फिरला. कारण त्याला सकाळीच दोन चैनी पाठीवर पडताच सारं ब्रम्हांड आठवलं होतं. आता पुन्हा तशा चैनी पाठीवर पडू नये व अंगाची लाहीलाही होवू नये, म्हणून तो शौचालयात न जाता माघारी फिरला. विचारणा केली.

"कशासाठी बोलवलं साहेब?"

"तपासणी आहे."

तपासणी...तपासणी आहे असं म्हणताच तो चूप बसला. शौचालयात जायचं राहून गेलं होतं. त्यातच ज्यांची ज्यांची नावं पुकारली गेली होती. तेही शौचालय सोडून रांगेत आले होते.

ते सर्व कैदी रांगेत लागताच त्यांच्या शरीरावरचे सर्व कपडे काढण्यात आले. सर्व कैद्यांनी त्या कुडकुडत्या थंडीत आपले सर्व कपडे काढले. आता नेमकं काय होणार. सर्व कैद्यांना चिंता पडली. तपासणी म्हणजे नेमकं काय? सर्वांना प्रश्न पडला. तोच एकेक पुढे सरकू लागला. तसा त्या कैद्याबरोबर देवांशूही पुढं सरकला आणि देवांशूचा नंबर आला.

देवांशूचीही तपासणी झाली आणि तपासणी होताच जेवनही आलं. कोणी म्हणत होतं,

"जेवन घ्या, नाहीतर ते परत जाईल. मग सायंकाळपर्यंत मिळणार नाही."

भूकच ती. भूक त्याला फारच लागली होती. रात्रीही जेवन मिळालं नव्हतं. काय करावं सुचत नव्हतं. त्यातच ती भूक पाहून त्यानं शौचालयाचा नाद सोडला व आधी जेवन घेतलं.

ते जेवन, जेवन करावंसं वाटत नव्हतं. पोळयांमध्ये जणू मातीचे अवशेष भरल्यागत त्या पोळया घासागणीक कच लागत होत्या. त्यातच

भातही तसंच वाटत होतं. जेवन पोटभर नव्हतंच मुळी. मोजून पोळ्या दिल्या होत्या आणि वाटीभर भात. भाजी मात्र भरपेट होती. त्या भाजीत थोडंसं मट्रेल व बाकी सारा रस्सा भरला होता. ती भाजी, भाजीसारखी वाटत नव्हती तर त्या भाजीत ना तेल दिसत होतं, ना तिखट. ना तिला चव होती ना काही. परंतू देवांशू ते जेवन आवडीनं खात होता. कारण त्याला आतापर्यंतच्या आयुष्यात तसंच जेवन मिळालं होतं.

जेवन झालं होतं. तसं जेवन होताच तो शौचालयात गेला व आरामशीर आता शौचालयात बसला होता. तसे त्या शौचालयातच त्याचे विचारचक्र सुरु झाले होते.

*********************************

तो तुरुंग. त्या कैद्यांना सुधारायचं केंद्र होतं ते. त्यांना त्या तुरुंगात प्रशिक्षण मिळत होतं व्यवसायाचं. नवनवीन आलेले अधिकारी होते तिथं. नवीन आलेल्या कैद्यांना आधी विचारत होते ते अधिकारी की त्यांना कोणत्या व्यवसायाची आवड आहे. त्यांच्या आवडीनुसार त्यांना काम वाटप होत होते.

देवांशू ज्यावेळी शौचालयातून बाहेर पडला. तसा पुन्हा पुकारा झाला. तसा तो परत घाबरला. 'कशासाठी बोलावलं असेल पुन्हा.'

तसा पुकारा होताच तो आतमध्ये गेला. तसं तिथं बसलेल्या एका व्यक्तीनं विचारलं,

"कोणतं काम करीत होते आधी?"

"लिहीत होतो."

"म्हणजे?"

"मी लेखन करतो."

"म्हणजे आपण लेखक आहात तर."

"होय."

"परंतू लेखनावर पोट भागत होतं का आपलं?"

"नाही."

"मग आपलं पोट भागविण्यासाठी काय करीत होते तुम्ही?"

"भीक मागत होतो जी."

"भीक! का? तरुण आहात लेखकही आहात आणि भीक मागत होतो म्हणता. अगदी खरं खरं सांगा. लेखक कधी भीक मागतात का? त्यांच्या लेखनीत असा दम असतो की ते उभ्या जगाला विकत घेवू शकतात. अहो,

तुम्ही विचारच करु शकत नाही, एक लेखक किती कमवतोय त्याचा. जावू द्या. आपल्याला काय सांगावं आणि काय विचारावं."

"..." त्या अधिकाऱ्याचं बोलणं. तसा तो चूप होता. ते पाहून तो अधिकारी परत म्हणाला,

"ओ मिस्टर, आपण भीक मागत होतो म्हणता? का बरं असं म्हणता?"

"साहेब, आता लेखकाला भीकच मिळते. पैसे नाही मिळत. फुकट वाटाव्या लागतात पुस्तका. कोणीच घेत नाहीत आजकाल. फुकटच्याही पुस्तका कोणी वाचत नाही. मग पैसा कुठून येणार. भीकच मागावी लागेल ना मग."

"हो, तेही बरोबरच आहे. आणखी एक विचारतो. ओ मिस्टर, कदाचीत आपलं खरंही असेल, परंतू एक गोष्ट ही की एक लेखक समाज सुधारतो. असा आपल्यासारखा तुरुंगात येत नाही. पुर्वीचा काळ गेला. तर याबद्दल बोलतांना मी विचारेल की नेमके आपण मला गुन्हेगार वाटत नाही. तसं पाहता गुन्हेगार हा शब्द चेहऱ्यावर लिहिलेला नसतोच. गुन्हेगार कोण आहे व कोण नाही हे चेहऱ्यावरुन ओळखणं तसं कठीणच. परंतू मला सांगा की नेमका गुन्हेगार कोण? याचा शोध घेण्यासाठी तुम्ही सांगा तुमची जीवनी. काय घडलं ते. मला ऐकायला आवडेल. मी काही करु तर शकणार

नाही. परंतू तुमचं मन हलकं होईल. तसं एक सांगू. या तुरुंगात येणारा प्रत्येक माणूस हा गुन्हेगार नसतोच. त्याला कधीकधी फसवलं जातं. तर सांगा मला आपली जीवनी."

तो तुरुंग अधिकारी समजदार वाटत होता. तसं त्यानं विचारताच देवांशूला हुंदका भरुन आला व तो आपली जीवनी सांगू लागला. क्रमबद्धपणे. अगदी लहानपणापासूनच. काय घडलं ते. अगदी बारकाईनं. परंतू ते सांगतांना कधीकधी त्याला रडंही येत होतं.

"मी लहान होतो. आम्ही सात भावंडं. आम्ही मजेत राहात होतो. आमची शेती होती. त्या शेतीवर जात होतो. माझे वडील राबत होते शेतात आणि आम्हाला पोषत होते. तसं पाहता आम्हाला अन्न पोटभर मिळायचं नाही. म्हणून आम्ही शेतावर कधी खेकडे पकडायचो तर कधी रानात रानमांजरी. ते आमचं अन्न होतं. त्यावर आमचा उदरनिर्वाह चालायचा. आम्ही कधी किड्या मुंग्यांवर जीवन काढलं. कारण आम्हाला खायलाच मिळायचं नाही.

मी जेव्हा सात वर्षाचा झालो ना, तेव्हा माझ्या वडीलांनी मला शाळेत टाकलं. शाळेतील बाई छान छान शिकवायची. ते शिकवणं आवडायचं मला. आनंद वाटायचा. त्या ज्ञानानुसार वागावसं वाटायचं.

एकदाचा प्रसंग. आम्हाला बाईंनी शिकवलं होतं की मांस खावू नये. पाप होतं. ते निष्पाप जीव असतात. त्यांची हत्या करु नये. त्यानुसार मला नंतरच्या काळात मांस खाण्यावरुन किळस यायची. ते पाहून मी मांस खात नव्हतो आणि मी रानातील ती मांजरही पकडत नव्हतो. मासेही आणि खेकडेही पकडत नव्हतो. कारण मला आता बाईच्या म्हणण्यानुसार त्यांना पकडणे व खाणे पाप वाटत होतं. वाटत होतं की आपण त्यांना खातो, म्हणजे जीव हत्याच करतो. तसं मला वाटताच मी मासे पकडायला नकार दिल्यानं माझ्या वडीलांना ती गोष्ट खटकत होती म्हणून की काय ती गोष्ट विचारात घेऊन माझ्या वडीलांनी मला शाळेतून काढलं नव्हे तर मी काही कामाचा नाही म्हणून मला विकून टाकलं होतं.

मला श्रीधर नावाच्या माणसाने विकत घेतलं. त्यानं मला जेवन तर दिलं. परंतू त्यानं मला अति त्रास दिला. तो मला गुलामासारखा वागवत असे. माझ्याकडून आपले पाय चेपून घेत असे. मिही आळस न करता त्यानं सांगितलेले सर्व काम न चुकता करीत असे. तसा तो एकदाचा प्रसंग घडला.

माझा मालक म्हणजे श्रीधर घरी नव्हता. त्यावेळी अचानक एक कॉल आला व मी बोलायला लागलो. तशी पुढील व्यक्ती म्हणाली,

"हैल्लो, मी रिया बोलतेय."

"बोल, कोण हवंय तुला?"

"तू एकटाच घरी आहे ना."

"होय. मी एकटाच घरी आहे. का बरं?"

"तू देवांशू बोलत आहे ना."

"होय मी देवांशूच. का बरं."

"मला बोलायचं आहे तुझ्याशी. बोलते ना."

"होय बोलतोय."

"मला मैत्री करायची तुझ्याशी. बोल करशील ना."

"होय करेल."

"पण मला मोबाईलवर बोलणं आवडते. बोल, बोलशील ना."

"होय, बोलेल. परंतू हा फोन माझा नाही. हा फोन दुसऱ्याचा आहे."

"ठीक आहे. तुला जेव्हा सवड मिळेल, तेव्हा बोलशील माझ्याशी. तूच फोन लावशील मला."

"ठीक आहे." असं म्हणत तिनं फोन ठेवला.

मिही तरुणच होतो. मी रियाशी बोलत असे. श्रीधर घरी नसला आणि त्याचा फोन घरी असला की मी त्याच फोनवरुन रियाला फोन लावत असे.

तसा तो त्या दिवशीचा प्रसंग. रियाचा मला फोन आला होता. तिचं ते बोलणं.

"व्हिडीओ कॉल कर. मला तुझ्याशी व्हिडीओ कॉलवर बोलायचं आहे. तुला पाहायचं आहे मला."

"का बरं?"

"तुला बोलायचं नाही का?"

"बोलायचं आहे."

"मग कर ना व्हिडीओ कॉल."

तो रियाचा फोन. त्यातच तिला मी व्हिडीओ कॉल केला. त्यातच त्या व्हिडीओ कॉलवर तिकडून ती रिया नावाची मुलगी बोलू लागली. तीच संधी साधून तिचं माझ्यासोबतचं अश्लीलतेनं संभाषण. माझंच ते वय. ते वयच तसं होतं.

रिया नावाची ती मुलगी. त्या मुलीनं ऑनलाईन फोन लावला मला नव्हे तर व्हिडीओ कॉल केला. तसं पाहता तिनं अश्लीलतेचं प्रदर्शन केलं. त्यानंतर तिनं ते अश्लीलतेचं प्रदर्शन रेकॉर्डींग केलं.

थोड्या वेळाचा अवकाश. त्या श्रीधरच्या मोबाईलवरच व्हाट्सअपवर एक व्हिडीओ क्लीप आली. त्या क्लीपमध्ये पुर्णपणे माझ्या नग्नपणाचं

चित्रीकरण होतं व थोड्याच वेळात फोन आला व फोनवर धमकी आली की मी व्हिडीओ कॉलवर अश्लील प्रदर्शन केलं आहे. त्याचा मुआवजा तिला द्यावा. नाहीतर ती माझी तक्रार पोलिसांना करणार आहे.

मी पुरता घाबरलो. तसं पाहता मी श्रीधरच्याच घरी राहात होतो. त्यानं दिलेल्या तुकड्यावर मी लहानाचा मोठा होत होतो. मी त्याचा जणू गुलामच होतो आणि गुलामाला कोणतीच अब्रू नसते असं मला तिथं वागवत होते.

आज मला आलेली ती रियाची धमकी. घाबरुन गेलेला मी. मी त्या मोबाईल कॉलवर खरी खरी माहिती रियाला दिली. त्यात मला तसं काही होणार याची माहिती नव्हती. परंतू तसा अब्रूनुकसानीचा मेसेज व कॉल येताच मी घाबरलो व मी तो कॉल पुन्हा येवू नये म्हणून तो मोबाईल नंबर ब्लॉक केला.

मोबाईल क्रमांक ब्लॉक केला खरा. परंतू त्या फोनवर तिचे फोन वारंवार येवू लागले. त्यातच ती गोष्ट श्रीधर बोलतो असे सांगताच ती बोलायची नाही. कधीकधी श्रीधर घरी नाही असं पाहून ती बोलायची. मला धमकीही द्यायची. तशी ती गोष्ट एक दिवस श्रीधरला माहीत झाली व श्रीधरनं मला घरातून हाकलून दिलं.

मला श्रीधरनं घरातून हाकलून दिलं खरं. परंतू रियाचा फोन काही पिच्छा सोडत नव्हता श्रीधरचा. अशातच एक दिवस श्रीधर म्हणाला रियाला की अशी धमकी देण्यापेक्षा तिनं माझी तक्रार पोलीसस्टेशनला टाकूनच द्यावी. त्याच धमकीच्या अनुषंगानं आज रियानं ती माझी व्हिडीओ क्लीप जोडून पोलीसस्टेशनला तक्रार दाखल केली होती व पोलीस त्या तक्रारीनंतर मला शोधत फिरत होते. श्रीधरच्या बापाचं काय जाणार होतं. रियाला तक्रार टाक म्हणतांना. गेलं ते माझंच ना.

मी सेक्सटार्शनचा बळी ठरलो होतो. नकळत माझ्या हातून चूक घडली होती व रियानं ती तक्रार पोलिसांना केली होती व पोलीस माझा शोध घेत होते.

मोनिकाची माझी ओळख झाली होती. तसं माझं तिच्याशी बोलणं झालं होतं. त्यानंतर आम्ही एकमेकांशी बोलत राहिलो. कधी फोनवर तर कधी असेही. त्यामुळं की काय, आता मोनिकाची भीती वाटत नव्हती मला. मी अगदी बिनधास्त होवून बोलत होतो मोनिकाशी.

मोनिकाशी माझं प्रेमानं बोलणं. त्यातच मोनिकाची वारंवार माझ्याशी होत असलेली भेट. आमच्यात प्रेम निर्माण करणारी गोष्ट होती. आम्ही

आता एकमेकांवर प्रेम करु लागलो होतो. अशातच एक दिवस मला तिचा फोन आला.

"मला तुम्हाला भेटायचे आहे. बोला, भेटाल का?"

"होय, का नाही भेटणार."

मोनिकाची मैत्री. त्यातच तिच्यावर असलेला विश्वास. आमची फुलत चाललेली मैत्री. आज एकमेकांवर जीवापाड प्रेम करणारे आम्ही. मला ती विश्वासघात करेलच असं वाटत नव्हतं. कारण तिही गोड गोड बोलत होती माझ्याशी.

ती भेटायला आली. तसा मिही. त्यातच आमचं संभाषण सुरु झालं. संभाषणात बोलता बोलता ती म्हणाली,

"मला तुझ्याकडून दरमहा महिना हवाय."

"का? मी असा कोणता गुन्हा केलाय."

"गुन्हा! तू फार मोठा गुन्हेगार आहेस. मला बोलावलं. फिरवलं. बोल, मी फिरले की नाही तुझ्यासोबत."

"होय. फिरली तू. परंतू त्याचे एवढे पैसे?"

"होय. का? मी रिकामी होती का तुझ्यासोबत फिरायला. मला काही कामधाम नव्हते का?" मोनिकानं विचारलेले प्रश्न, माझ्या काळजाला

भिडले होते. आज मी तिला भेटण्यापुर्वी अतिशय आनंदी होतो. परंतू आताच्या तिच्या बोलण्यानं माझ्या आनंदावर विरजण पडलं होतं. तो आनंद पार दुःखात मिसळून गेला होता. त्यात आता तीळसंक्रांतीचा तिळगुळ नव्हता.

मी गप्प होतो काहीवेळ. ते पाहून मोनिका म्हणाली,

"आता बोल ना. आता गप्प का? तुला फिरायला लय मजा आली तेव्हा आणि आता पैसे म्हटले तर गप्प झाला. अरे मुलीचं जीवन का असंच असतं का? कोणीही चाल म्हणावं आणि त्याचेसोबत फुकटात फिरावं."

" मी थोडं ना चाल म्हटलं फिरायला. तूच नेलं ना फिरायला."

"आता एक शब्दही बोलू नगंस. फक्त एक सांग की तू पैसे देणार की नाही."

"काय करणार."

"काय करणार म्हणजे?"

"काय करणार नाही पैसे दिले तर..."

"काय करणार म्हणजे? अरे पोलिसात जाईल. तुझी बदनामी करील. तू लेखक आहे ना. महान लेखक. तुझी प्रतिष्ठा धुळीस मिळवील."

"जा मिळव. माझ्याकडे नाही आहेत पैसे. माझा गुन्हाही नाही तरी छळ करतेस माझा. हा स्री अत्याचार आहे माझ्यावर."

"तुझ्यावर...तुझ्यावर माझ्या एकटीचाच स्री अत्याचार. अन् ती रिया कोण होती. तिच्यावर अत्याचार झाला नाही का तुझा. अरे लोकं का फालतूच केस टाकतात का? तिनंही टाकली ना केस."

"ते गडलेले मुदडे कशाला काढतेय. तुला माहीत आहे का रियाचं प्रकरण. काय झालं ते तरी माहीत आहे का तुला? त्यात माझा गुन्हा तरी होता का? अगं एक फोन आला. मग मिही बोललो त्या फोनवर. बस एवढाच माझा गुन्हा. फोनवर बोलणं हाच गुन्हा झाला माझा."

"हो का? तू जसा साधाच बोलला होता की नाही तिच्याशी. तूला अश्लील बोलायला कोणं सांगीतलं होतं. तो गुन्हा नाही का तुझा."

"हो, तेवढीच एक चूक झाली. परंतू तिनं बाऊ केला त्या प्रकरणाचा. मला समजत तरी होतं का त्या वयात. अन् पैसे कमविण्यासाठी तिनं ती केस टाकली."

"मला तिचं काही करायचं नाही. मला एवढंच माहीत आहे की मी तुझ्यासोबत एवढी फिरली. तुला फिरतांना मजा आली. आता मला दरमहा

पैसे हवेत. नाहीतर मी पोलिसात तुझी तक्रार करतो. मंजूर असेल तर सांग. नाहीतर मी मोकळी पोलीसस्टेशनला जायला."

"काय पुरावा आहे की मी फिरलो तुझ्यासोबत."

"पुरावा म्हणजे? अरे फोटो आहेत तुझे त्या स्पा ॅटवर काढलेले माझ्यासोबतचे. अन् रेकॉर्डींगही आहे तुझ्यासोबतच्या बोलण्याचे. त्यात रियाचीही तक्रार पोलीसस्टेशनला सुरु असल्याचे सांगितले आहे तू. सगळं आधीपासूनच रेकॉर्डींग केलं मी. ती अश्लीलताही रेकॉर्डींग करणार होते मी. परंतू तू फसला नाही त्यात. तिच माझी चूक झाली तेवढी."

मोनिका बोलत होती. तसा मी पुरता घाबरलो होतो आतून. परंतू हिंमत करुन मी उत्तरं देत होतो. माझा गुन्हा नव्हता, ना मी तिला लाईक केलं होतं. तिनंच मला लाईक केलं होतं व दोस्तीही. तिनंच फिरवलं होतं मला आणि सगळं रेकॉर्डींगही करुन ठेवलं होतं. मी मात्र साधाभोळाच वागलो होतो तिच्याशी. कारण मला त्या गोष्टीची कल्पना नव्हती.

दोन्ही प्रकरणं. दोष नसतांना मीच फसलो. असं मला मनोमन वाटतं. बाकीची काही मंडळी अख्खं कांड करुन टाकतात. परंतू त्या गोष्टीची कल्पना कोणालाही येवू देत नाहीत. अन् मी साध्या गोष्टीनं फसलो. मी नंतर

विचार केला की नाही आता साधं राहायचं नाही. जाईल तर जावू दे पोलीसस्टेशनला. पाहून घेवू. कुठंपर्यंत घाबरत राहायचं आपण."

मी तसा विचार करु लागलो व शेवटी म्हणालो,

"जा. तुही टाक तक्रार पोलीसस्टेशनला रियासारखीच. टाकून दे तुही केस."

मोनिकानं ते माझं बोलणं ऐकलं. तिला वाटत होतं की आपण जर देवांशूला तसं बोलू तर तो घाबरेल व मला दरमहा पैसे देईल व मला बसून खाता येईल. तशीच मजाही उडवता येईल.

मोनिकाचा तो विचार. तिचं ते बोलणं. ती निघून गेली होती.

ती निघून गेली. परंतू निघून गेल्यावर ती सरळ घरी गेली नाही. ती पोलीसस्टेशनला गेली. कारण तिला पैसे कमवायचे होते माझ्याकडून. त्यामुळं मला त्रास देणं बंधनकारक होतं.

तिनं ती माझी तक्रार पोलीसस्टेशनला दिली. तसा माझा फोननंबरही दिला तिनं पोलीसस्टेशनला आणि ती घरी निघून गेली.

मी साधा भोळा मुलगा होतो. परिस्थितीनं गांजलेला. लहानपणी मला मायबापानं विकून टाकताच माझ्या अंगाखांद्यावरुन मायबापाचा आधार निघून गेला होता. त्यानंतर मी वाढलो त्या श्रीधरच्या आधारानं. त्यानंही

त्रास देत देत मला वाढवलं होतं. कधी उपाशी राहून तर कधी शिळं पांत खावून मी लहानाचा मोठा झालो. त्यातच ते दुधाचे ओठ सुकताच माझ्या मागं लागली ती रियाची तक्रार. त्यातच श्रीधरनं हाकलून दिलं मला घरातून. शेवटी मी रस्त्यारस्त्यावर राहिलो भीक मागत अन् भीक मागत मागत जगलो. लपत राहिलो काही दिवस. रियाची केस अंगावर येईल म्हणून. या शहरातून त्या शहरात. शेवटी तेच झालं. मोनिकानं त्याच गोष्टीचा फायदा घेतला. यावेळी गुन्हा तिनंच केला आणि थोपवला माझ्यावर.

ती नियती कसली निष्ठूर होती. ती कर्म करुन घेत होती माझ्याकडून. मी चांगले कार्य करीत होतो लेखन करुन. मी आपल्या लेखनीनं समाजाला जागृत करीत होतो. परंतू नियती माझ्या मागं कधी रियाची तर कधी मोनिकाची तक्रार लावत होती.

रियाचा आधार देत मोनिकानं माझी तक्रार पोलीसस्टेशनला दाखल केली आणि ती घरी निघून गेली. तसे दोनतीन दिवस निघून गेले. तोच दोनतीन दिवसानंतर माझा फोन खणखण वाजला. तसा मी बोललो,

"हैल्लो, कोण?"

"मी पोलीस सब इनस्पेक्टर. अमूक अमूक पोलीसस्टेशनमधून बोलत आहे."

"बोला साहेब."

"आपण देवांशू का?"

"होय."

"आपण मोनिकाला ओळखता का?"

"होय, का बरं?"

"तक्रार आहे तिची तुमच्याविरोधात."

"कशाची?"

"तुम्ही पोलीसस्टेशनला या. सगळं सांगतो."

"ठीक आहे साहेब." मी म्हणालो व मी फोन ठेवला.

साहेब मला आलेला पोलिसांचा फोन. मोनिकानं केस दाखल केली होती पोलीसस्टेशनला. त्यातच आता मी पुरता घाबरलो होतो. काय करावं सुचत नव्हतं. मोनिकाची ओळख होताच नुकताच मी दुसरीकडे चांगल्या ठिकाणी किरायानं गेलो होतो राहायला. मलाही वाटत होतं की आपलं आता वय होत आहे. आपण मोनिकाशी विवाह करावा व सुखानं जगावं. मला काय माहीत होतं की मी जे विचार करीत आहे, त्याच्या अगदी उलट होईल. तिनंही तिच्या डोळ्यातून पाणी हालू दिले नव्हते.

ज्यावेळी शेवटच्या दिवशी तिनं मला भेटायला बोलावलं होतं, त्यावेळी मी विचार केला होता की आज मी तिच्याशी विवाहाविषयीचं बोलेल. विचारेल की आपण केव्हा विवाह करायचा. परंतू तिनं ती गोष्ट न करता भलतीच गोष्ट केली होती आणि आज तर माझी तक्रारच टाकून दिली होती पोलीसस्टेशनला.

तो दिवस तसाच गेला. तसा तो दिवस जाताच मी सकाळीच उठलो. मला पोलीसस्टेशनला बोलावले होते मोनिकाच्या केसबद्दल.

मी सकाळीच उठलो. मी प्रातःविधी आटोपवला व मी पोलीसस्टेशनला जाण्यासाठी तयार झालो. थोड्याच वेळात मी पोलीस स्टेशनला पोहोचलो. त्यावेळी अनंत विचार होते माझ्या मनात. पोलीस स्टेशनला जाताच एका पोलिसानं विचारलं,

"काय नाव तुमचं?"

मी त्याला आपलं नाव गाव सांगीतलं. तशी सर्व इत्यंभूत माहिती सांगीतली व काय काय घडलं तेही सांगीतलं. त्यावर पोलीसवाले म्हणाले,

"मिस्टर, तुम्ही अगदी निष्कलंक असाल. तरीही आता ही केस नोंद झाली ना. त्यामुळं आपणाला अटक करावीच लागेल. कारण ही एका महिलेची तक्रार आहे. ही काही साधी सुधी तक्रार नाही. आपल्यावर

फौजदारी कारवाई करावीच लागेल आम्हाला. आपण हवं तर एखादा साक्षीदार आणा."

"साहेब, या जगात माझं कोणीच नाही. शिवाय मला या केसमध्ये फसवलं गेलं आहे."

"ते काही आम्ही जाणत नाही. तुम्ही हवी तर न्यायालयात दाद मागू शकता."

पोलिसांचं ते बोलणं. मी चूप बसलो. त्या पोलिसांसमोर मी निर्दोष असलो तरी माझं काही चाललं नाही. शेवटी मी हताश झालो व मला त्या पोलिसांनी माझा गुन्हा नसतांनाही अटक केली.

मला पोलिसांनी अटक केली होती. अटकेनुसार मला दुसऱ्या दिवशी न्यायालयात सादर करण्यात आलं व माझ्याकडे जमानतदारही नसल्यानं माझी रवानगी तुरुंगात झाली व मी गुन्हेगार नसतांनाही मला जाणूनबुजून जबरदस्तीनं शुल्लक चुकीनं गुन्हेगारांच्या रांगेत बसवलं गेलं. त्यानंतर मला इथं आणलं गेलं.

देवांशूनं त्या तुरुंग अधिकाऱ्याला आपली जीवनी सांगीतली होती. त्यातच तो तुरुंग अधिकारी भावूक झाला होता. ते ऐकून तो म्हणाला,

"खुप रंजीत आहे तुमची जीवनी. तुम्ही लेखक असून व समाजाचा आरसा असून तुम्हाला अनंत यातना झेलाव्या लागत आहेत. हा तुमचाही एक इतिहासच आहे. पण वाईट वाटून घेवू नका. बऱ्याचशा लेखकांना तुरुंग भोगावंच लागलं. तुरुंगाच्या झळा सोसाव्याच लागल्या. स्वातंत्र्यवीर ज्यांना म्हणतो ना, ते सावरकर अंदमानाच्या तुरुंगात होते. काही पुस्तकं त्यांनी तुरुंगातच लिहिली. श्यामच्या आईचे लेखक साने गुरुजी हेही गतकाळात तुरुंगातच होते. एवढंच नाही तर ज्यांनी देशाला अहिंसात्मक मार्गानं स्वातंत्र्य मिळवून दिलं, ते महात्मा गांधी तुरुंगातच होते. असे बरेच जण आहेत नव्हे तर बरेच लेखक आहेत की जे तुरुंगात होते. परंतू त्यांनी आपली लेखणी थांबू दिली नाही. ते हताश झाले नाही तुरुंग मिळाल्यानं. असे म्हणू की नियतीनं त्यांना तुरुंगात टाकलं. परंतू ते हारले नाहीत. त्यांनी तुरुंगातही लेखन सुरु ठेवलं. बरीच पुस्तकं लिहिली तुरुंगात आणि प्रकाशीतही केली तुरुंगातून. अहो, तुरुंग हे कैद्यांना सुधारण्याचं केंद्र असतं. आम्ही कैद्यांकडून चांगल्या, उत्तम दर्जाच्या वस्तू बनवून घेतो आणि बनवतात ते उत्तम दर्जाच्या वस्तू.

महत्वाचं सांगतो मी की कैद्यांमध्येही चांगले गुण असतात. त्यांना संधी दिली तर ते त्या संधीचं सोनं करुन टाकतात. ते मुळात गुन्हेगार नसतातच. परिस्थिती त्यांना गुन्हेगार बनवते. तशी परिस्थीतीच घडून येते की त्यांना

गुन्हा करावा लागतो व गुन्हेगार बनावं लागतं त्यांना. याबाबतचा एक प्रसंग सांगतो. गतकाळात एक असाच व्यक्ती या तुरुंगात शिक्षा भोगण्यासाठी आला होता. त्याचा हा प्रसंग. आपल्या पत्नीला ठार केलं होतं त्यानं. कारण मी म्हणतो म्हणून नाही तर त्यानं त्याचेवर घडलेली आपबीती सांगीतली म्हणून. या प्रसंगात त्यानं वर्णन केलं होतं की त्याची पत्नी ही रात्र झाली की शौचास जायची. ती जेव्हा शौचास जायची. तेव्हा त्याचवेळी त्याच्या शेजारचा व्यक्तीही शौचास जायचा. त्यावेळी शौचालय घरी नव्हतं. बाहेर जावं लागायचं शौचाला.

जो व्यक्ती तिचा खुन करुन या तुरुंगात आला होता, त्यानं सांगीतलं होतं की मी बरेचदा माझ्या पत्नीला समजावलं की तो शौचास निघतो, तेव्हा तू शौचास जावू नये किंवा तुला जर शौचास जायचे असेल तर रात्रीला जावू नकोस. परंतू ती गोष्ट ती काही ऐकत नव्हती. त्यातच त्यानं त्या दोघांचं बरेचदा निरीक्षणही केलं होतं. त्या निरीक्षणात त्यानं सांगीतलं की दोघंही घरुन शौचाचा डबा घेवून निघायचे. तिकडे गेल्यानंतर दोघही पाणी फेकायचे व प्रणयक्रिडा करुन परत यायचे. हे बरेचदा मी स्वतः डोळयानं पाहिलं व बरेचदा मी तिला समजावलं. परंतू तिनं माझं ऐकलं नाही. जेव्हा ते दोघंही एकाच वेळेला शौचास निघायचे. तेव्हा तळपायाची आग मस्तकात जायची. अन् जाणारच. कारण ती त्याची पत्नी होती. शेवटच्या

समयी तो म्हणाला की ज्या रात्री त्यानं तिचा खुन केला, त्यादिवशी आणि त्याच्या दोनचार दिवसापासून त्यानं धमकीही दिली होती की तिनं तो निघताच शौचास जावू नये, नाहीतर तो तिचा खुन करणार. परंतू तिनं त्या गोष्टीकड कानाडोळा केला व ती शौचास गेली. त्यानंतर ती जेव्हा परत आली, तेव्हा त्यानं तिचा खुन केला होता.

आता लेखक महोदय, या प्रकरणात त्याचं काय चुकलं की त्यानं पत्नीचा खुन केला. आज बऱ्याचशा अशा महिला आहेत की ज्या पतीसमोरच पतीला घराच्या बाहेर काढतात व आतमध्ये प्रेमींसोबत गुलछर्रे उडवीत असतात आणि बिचारे पती तो व्याभिचार उघड्या डोळ्यानं पाहात असतात. मग गुन्हे घडणार नाहीत तर काय? यात महिलाच केवळ जबाबदार नाहीत तर यात काही काही पुरुषही मागं नाहीत. तेही आपल्या पत्नींसमोर दुसऱ्या स्त्रियांसोबत गुलछर्रे उडवीत असतात वा व्याभिचार करीत असतात.

गुन्ह्यांसंदर्भात पाश्वभुमी सांगत असतांना मी आणखी सांगतो की भारताला जेव्हा स्वातंत्र्य मिळवून देण्याची वेळ होती. तेव्हा भारतीय कारभाराच्या विरोधात बोलण्याला परवानगी नव्हती. जो बोलला, त्याला इंग्रज जेरबंद करीत. त्यावेळी वकील त्यांचे, न्यायाधीश त्यांचे. मग न्यायच

कुठून भारताच्या बाजूनं. त्यामुळं भारतीयांचा गुन्हा नसला तरी भारतीय लोकं गुन्हेगार बनायचे.

लेखक महोदय, मी सांगीतलेल्या गोष्टीत तथ्यता आहे. सत्य आहेत या गोष्टी. आपण यावर लिहावं. लिहावं की गुन्हेगार हा जन्मतः गुन्हेगार नसतो. त्याला जाणूनबुजून गुन्हा करण्यासाठी उकसवलं जातं. मगच गुन्हा घडतो. याबाबत आणखी एक प्रसंग सांगतो. माझ्या गावच्या दोन शेजाऱ्यांची गोष्ट. दोन शेजारी राहात होते. त्यांच्या जागेच्या वाटणीत एक चिंचेचं झाड होतं. तेथून कंपाऊँड होतं शेजारच्याचं. त्यातील एक शेजारचा व्यक्ती अति गरीब होता. त्याला एकच मुलगा होता व दुसरा श्रीमंत होता. त्याला तीन मुलं होती व तो श्रीमंतही होता. त्या जागेवरुन त्यांची नेहमी भांडण व्हायची. जसंजसं ते चिंचेचं झाड पसरायचं. तसतशी ती जागा त्या गरीब व्यक्तीकडे धकायची व ते कंपाऊँडही धकायचं. त्यावरुन भांडणं.

आज त्या चिंचेच्या झाडाचा घेर वाढला व त्या चिंचेच्या झाडाच्या बुंध्याच्या मध्यभागातून जागा वाटपाचा अधिकार सांगण्याऐवजी तो श्रीमंत व्यक्ती त्या गरीबाच्या जागेचा हक्क त्या चिंचेच्या झाडाच्या बुंध्याच्या किनाऱ्यावरुन सांगू लागला. तेच भांडण. त्यामुळं ते भांडण एवढं विकोपाला गेलं की त्या गरीब व्यक्तीच्या मुलानं धारदार सलाख काढली व त्या श्रीमंत माणसावर हल्ला चढवला व गुन्हा घडला.

लेखक महोदय, बघा गुन्हे असेही घडतात. तुम्हाला सांगतो की ज्या गोष्टीसाठी आपण भांडतो ना. ती गोष्ट मरणानंतरही आपल्या सोबत येत नाही. ते सर्व इथलं इथंच राहातं. परंतू लोकं त्याचा विचारच करीत नाहीत. आज मनुष्य म्हाताराही होतो, परंतू लोभ सोडत नाही. याच राग, लोभ, द्वेष व मद, मत्सरानं गुन्हे घडतात. शत्रूत्व येतं.

गुन्हे कमी होवू शकतात. जर आपण आपले विचार बदलले तर. तसेच गुन्हे करतांना जर आपण त्या गुन्ह्यातील विचारात मृत्यूला मध्यस्थी ठेवले तर आणि गुन्हे कमी होतात, जर आपण लोभ, मद, मत्सर, राग, द्वेष यांना आपल्यापासून कोसो दूर ठेवले तर. परंतू आपण तसं त्यांना दूर ठेवतच नाही. मग गुन्हे घडणार नाही तर काय? आपण कधीच असा विचार करीत नाही की मरणानंतर मी यातील कोणती वस्तू नेणार. कोणतीच नाही. मग गुन्हा करायचा कशाला? तसेच आपण आपले विचारच बदलवत नाही गुन्ह्याबद्दलचे. मग गुन्हे कमी कसे होणार. आज असे बरेच गुन्हे घडत आहेत देशात. परंतू त्याला शिक्षेचं प्रावधान बरोबर नसल्यानं त्यांची संख्या वाढत आहे. आज चोर व पैसेवाले लोकं बिनधास्त फिरत आहेत. तसेच संन्यासी आणि गरीब विनापैसेवाले लोकं तुरुंगाची हवा खात आहेत. अशी परिस्थिती आहे देशात. कुठून गुन्हे कमी होईल. गुन्हे करतांना गुन्हेगारालाही वाटते की आपण मोठ्यात मोठा गुन्हा जरी केला तरी आपण जास्त काळ

तुरुंगात राहणार नाही. लवकरच वकील आणि पैशाच्या माध्यमातून जमानतीवर बाहेर येवू. ते जमानतीवर बाहेर येतात. पैसा आणि प्रतिपक्ष वकीलाच्या भरवशावर. साक्षीदारही विकले जातात व सर्राईत गुन्हेगार पुन्हा तसे गुन्हे करण्यासाठी मोकळे होतात.

विशेष सांगायचं म्हणजे गुन्हेगार हा आईच्या गर्भातून गुन्हे शिकून येत नाही. तशी परिस्थिती उद्भवते. तशी परिस्थिती उद्भवली की कोणताही माणूस शांततेनं विचार करीत नाही. तो भडकतो व तो भडकला की गुन्हे घडतात.

महत्वाचं म्हणजे गुन्हे हे घडू नयेत. यासाठी गुन्ह्याचं तत्वज्ञान बाळगावं. ते तत्वज्ञान हेच सांगतं की अशी गुन्ह्याची विपरीत परिस्थिती उद्भवल्यास शांततेनं विचार करा. ती वेळ जावू द्या. वाट पाहा. मगच निर्णय घ्या. तेव्हाच गुन्ह्यांची संख्या कमी होईल व गुन्हेही कमी होतील. हे तेवढंच खरं. याबाबत आपलं काय मत आहे लेखक महोदय.

"माझं मत...मी काही एवढा मोठा लेखक नाही की आपणाला सांगू शकेल. मी काही एवढा मोठा व्यक्ती नाही की आपणाला माहिती देवू शकेल. मी गुन्हेगार आहे आणि आता आपला कैदीही. त्यामुळे मी काय सांगू शकणार आपल्याला."

"अहो, आता थोडावेळ असं समजा की आपण गुन्हेगार नाही व कैदीही नाही. एक सामान्य व्यक्ती आहात. असं समजून आपण आपलं मत मांडा."

तुरुंगधिकाऱ्यानं म्हटलेल्या गोष्टी. त्यातच त्यानं दाखवलेल्या सहानुभूतीच्या जोरावर देवांशू भारावून गेला व तो आपलं मत मांडण्यासाठी सज्ज झाला.

"तुरुंगधिकारी साहेब, मी काय परामर्श द्यावा गुन्ह्यांच्या बाबतीत. अहो, मी तर स्वतःच गुन्हेगार आहे. तरीही एक सांगतो की काही गुन्हे हे अनवधानानं घडतात. ते नियोजीत नसतात."

गुन्ह्यांचे प्रकार दोन आहेत. पहिला म्हणजे नियोजीत गुन्हा. हा गुन्हा अतिशय बारकाईने नियोजन करुन केला जातो तर दुसरा प्रकार म्हणजे नियोजीत नसलेला गुन्हा. जसे एखाद्याच्या घरी चोर आल्यास व त्या चोरापासून वाचण्यासाठी अकस्मात उगारलेल्या शस्त्रानं घडलेला गुन्हा. माझ्याबाबतीत जो गुन्हा घडला. तो मला फसविण्यासाठी कोणीतरी रचलेला डाव होता. अलीकडे असेच गुन्हे घडत आहेत. मी याबद्दल जास्त सांगू शकत नाही."

"तरीपण मी म्हणतो की लेखक महोदय, आपण आजच्या न्यायव्यवस्थेवर आधारीत एक पुस्तक लिहावी. त्या पुस्तकानं न्यायव्यवस्था बदलून जावी. तसेच तुमच्या पुस्तकानं अशी क्रांती व्हावी की गुन्हेगार कमी व्हावेत आणि गुन्ह्याचे प्रमाणंही."

"ठीक आहे. मी प्रयत्न करेल." देवांशू म्हणाला.

ते तुरुंगातील दिवस मोठे कठीण होते. सकाळी उठल्यावर एक दोन तास रांग लावून बसावी लागायची. ज्या वेळात त्याला लिहावंसं वाटत होतं. त्यानंतर लगेच प्रातःविधीसाठी नंबर लावावा लागायचा. त्यातही काही लोकं अजिबात आंघोळ करीत नव्हते. सर्वत्र अस्वच्छता होती. मात्र देवांशू दररोज आंघोळ करायचा. त्यानंतर जेवन करुन देवांशू शेतीकामाला जायचा. त्यानं काम करण्यासाठी शेतीकाम निवडलं होतं. शेतीकाम दोन वाजतापर्यंत केल्यावर तो त्याच्या निवासस्थानी यायचा. त्यातच हातपाय धुवून मिळालेला फावला वेळ तो लिहिण्यासाठी वापरायचा. चार वाजले की जेवन व्हायचं व सगळे ज्याप्रमाणे बेंडव्यात कोंबडे बेंडतात, तसे ते कैदी कोंडले जायचे त्या तुरुंगात.

तुरुंगात देवांशू लिहित होता न्यायदानावर आधारीत पुस्तक. न्यायदान कसं असावं, गुन्हे कसे घडतात, गुन्हे घडू नये म्हणून काय उपाययोजना

करता येतील तसेच वकीलाची भुमिका कशी असावी? या सर्व गोष्टी त्यानं पुस्तकात लिहून टाकल्या होत्या. तो लिहितच होता पुष्कळ गोष्टी. त्या गोष्टी तो तुरुंगधिकाऱ्याला दाखवत होता. तो तुरुंगधिकारीही त्याचं अभिनंदन करीत होता.

देवांशू गुन्हेगार नव्हता. परंतू त्याला रिया आणि मोनिकानं गुन्हेगार ठरवलं होतं. त्यातच त्याच्याजवळ साक्षीदार नसल्यानं त्याला तुरुंगात टाकलं होतं. शिक्षा अजून व्हायची होती. पेशी होत होती. पेशीवर दरवेळी त्याला हजर केलं जात होतं. अशातच ती पुस्तक अर्धी झाली.

पुस्तक अर्धी झाली होती. तसा तो त्या तुरुंग अधिकाऱ्याच्या मार्गदर्शनातून लिहिणारही होता. परंतू अशातच तो एक दिवस उजळला. त्याला तुरुंग अधिकाऱ्यानं बोलावलं. म्हटलं,

"देवांशू, तुझ्यासाठी आनंदाची बातमी आहे."

आनंदाची बातमी. देवांशू मनात विचार करु लागला. या तुरुंगात... या तुरुंगात कसली असेल माझ्यासाठी आनंदाची बातमी. एखादा पुरस्कार तर नाही ना मिळाला एखाद्या लेखावर. परंतू तो कसा मिळणार. अलीकडे आपल्याला लेखही तर वर्तमानपत्रात टाकता येत नाही. जाताच येत नाही वर्तमानपत्राच्या कार्यालयात. किती नुकसान होत आहे माझं. परंतू जावू दे.

आता त्यावर पश्चाताप करण्यात काही फायदा नाही. विचारावं, कोणती आनंदाची बातमी आहे ती.

देवांशू विचार करु लागला. तसं त्यानं त्या तुरुंग अधिकाऱ्यालाच थेट विचारलं.

"साहेब, काय थट्टा करताय. या तुरुंगात माझ्यासाठी कोणती आनंदाची बातमी असणार. का मी मुक्त होणार या कैदेतून. माझी ओळख ना पाळख कोणाशी आणि या तुरुंगातून मुक्त व्हायला जे पैसे भरावे लागतात ते कोण भरणार. मला तर तुम्हीआनंदाची बातमी ऐकल्यावर आश्चर्यच वाटतं."

"होय, आनंदाचीच बातमी आहे तुझ्यासाठी. तू मुक्त झालाय कैदेतून. आता इथून सुटका झाली तुझी."

"सुटका! कोणं केली सुटका!"

"कोणीतरी रिया नावाची बाई आहे. तिनंच केली तुझी सुटका. तिनंच जमानत घेतली तुझी."

"रिया...कोण रिया. मी तर तिला ओळखत नाही."

"ते तुम्ही सुटका झाल्यावर विचाराल तिला. ती भेटणार आहे तुम्हाला. तुम्ही आधी तयार व्हा. जा आता."

"परंतू अधिकारी साहेब, एक विचारु."

"विचारा. काय विचारताय ते."

"मी बाहेर कसा जगणार. आता या वातावरणाची मला सवय पडली आहे. आता इथंच मला राहावंसं वाटतं. इथं आपल्यासारखी मायाळू माणसं भेटली जिवाभावाची. आता येथून जावंसं वाटत नाही. इथंच रमतं मला."

"हो, प्रत्येक कैद्यांना इथून जातांना तसंच वाटतं. त्यांना बाहेर करमत नाही. एकदा का येथील सवय पडली की गुन्हेगार बाहेर जास्त रमत नाही. तो कोणता ना कोणता गुन्हा करतोच व परत येतो इथे. माहेरावरुन आल्यासारखा. परंतू तुम्हाला माझी कळकळीची विनंती आहे की हे तुरुंग तुमच्यासाठी नाही. तुम्ही पुन्हा इथं परत यायचं नाही."

"ठीक आहे साहेब. परंतू आपली आठवण येणार मला. आपल्याएवढं प्रेम करणारं कोणीच मिळालं नाही मला. माझे मायबापही नाही. मी आपल्याला सदैव आठवणीत ठेवणार."

"ठीक आहे." तो तुरुंगधिकारी म्हणाला.

लवकरच देवांशूनं तयारी केली व तो त्या तुरुंगाच्या बाहेर पडला. तोच बाहेर पडताक्षणी त्यानं मागे वळून पाहिलं. त्यातच त्याला तो तुरुंग अधिकारी दिसला. त्यानं त्याला बाय केलं व तो त्या लहानशा दरवाजातून तुरुंगाच्या बाहेर पडला.

देवांशू तुरुंगाच्या बाहेर पडला होता. त्यातच त्याच्याजवळ एक महिला येवून उभी राहिली. काळा चष्मा लावलेली. कुरळे केस असलेली. पिवळा सलवार घातलेली ती एक तरुणी. ती त्याचेजवळ येवून म्हणाली,

"आपण देवांशू ना."

"होय, आपण?"

"मी ते नंतर सांगते. मी तुम्हाला न्यायला आलो आहे."

"अरे पण आपण कोण आहात? हे मला माहीत नाही. मग मी कसा येवू तुमच्यासोबत?"

"मी नंतर सांगते ना. चला आता. मुकाट्यानं चला तर."

"असं कसं? अहो, मी फसतच आलो महिलांच्या बोलण्यात येवून. आता मला फसायचं नाही. आपण कितीही म्हटलं तरी मी आता फसणार नाही आणि येणारही नाही तुमच्यासोबत. आधी ओळख सांगा."

"ठीक आहे. ऐका तर." असे म्हणत ती सांगू लागली.

"मी रिया. मी तुमची गुन्हेगार आहे. मी तुमच्या माफीची लायक नाही. कारण मी तुम्हाला भरपूर त्रास दिला. परंतू मला आता पश्चाताप झाला आहे. पश्चाताप होत आहे. हवं तर मला माफ करु नका. परंतू सध्या तरी चला माझ्यासोबत. मला तुमची गरज आहे."

"तर रिया तुम्ही होय. मी तुम्हाला आता पाहतोय. परंतू तुम्हाला माझ्याबद्दल कोणं सांगीतलं? अन् तुमच्यामुळं मला किती त्रास झाला."

"मोनिकानं जी केस टाकली होती. त्यात माझंही नाव होतं. त्यात माझा नंबरही होता. मी बदलवला नव्हता मोबाईल नंबर. त्यानंतर मला एके दिवशी पोलिसांचा फोन आला. पोलिसांनी बोलावलं मला. त्यानंतर मला सगळं कळलं व वाटलं की देवांशू आपल्यामुळंच शिक्षा भोगत आहे. म्हणून आले मी तुम्हाला सोडवायला. आता सरळ मनानं मला माफ करा आणि चला माझ्यासोबत. असं समजा की मी तुम्हाला घरी न्यायला आलो आहे."

"हो, तुमचं सगळं बरोबर आहे. मी यायलाही तयार आहे. परंतू अजून आपला कोणता डाव तर नाही."

"नाही. आता कोणताच डाव नाही माझ्या मनात. मी मागचं सारं विसरले आहे. चला आता."

रियाचं ते बोलणं. त्यावर तो काय समजायचं ते समजला व तिला माफ करुन तो तिच्यासोबत रवाना झाला.

*********************

"ही मोनिका कोण रे?" रिया म्हणाली.

"माझी मैत्रीण. माझा एकदा वर्तमानपत्रात आलेला लेख वाचून तिनं तो आवडला असल्याचा फोन केला. त्यानंतर ती भेटली मला. माझ्याकडून तुझ्याविषयी सारं काढून घेतलं. त्यानंतर ती गोड गोड बोलत फिरली माझ्यासोबत. मलाही वाटलं की ती चांगली आहे. माझ्या भावनांचा आदर करते. परंतू नाही, तो माझा भ्रम होता. ती माझ्याशी गोड गोड बोलत नव्हती तर ती माझ्याविरोधात पैसा कमविण्यासाठी पुरावे गोळा करीत होती. तिनं तू जो व्यवहार केला माझ्याशी. त्याचा गैरफायदा घेतला.

एक दिवस ती आली व म्हणाली की मला तूझ्याकडून दरमहा पैसे हवेत. नाही देशील तर मी तुझी तक्रार पोलीस स्टेशनला टाकणार. बस, मी त्या गोष्टीला नकार देताच तिनं माझी तक्रार पोलीसस्टेशनला दिली. ज्यात तू पाहिलंही आहे की मी शिक्षा भोगली."

"तर ती एवढी बदमाश आहे तर माझ्याहीपेक्षा."

"हो तर. अजूनही तिची केस सुरुच आहे."

"माहीत आहे देवांशू. मी तुझी तक्रार केली. परंतू भरपूर भोगलं आहे मी."

"म्हणजे?"

"माझी आई अन् बाप मरण पावले. मित्र मंडळी मला सोडून गेले. मला पश्चाताप झाला."

"कसे काय मरण पावले?"

"शाप लागला तुझाच. माहीत आहे इमानदार माणसाच्या वाट्याला गेल्यास शाप लागतो, तसंच झालं अगदी माझं. तुला त्रास दिल्यापासून माझी अधोगती झाली, त्यानंतर समजलं मला. माहीत आहे, इमानदार व्यक्ती तोंडातून शापीत शब्द बाहेर काढत नाही, परंतू त्याचा शाप लागतो बरं का? ज्यावेळी माझे मायबाप गेले, मला एकाकी सोडून. तेव्हा कळलं मला. परंतू आता मी तुला किंचीतही त्रास देणार नाही."

"हो का?"

"होय."

तो ते ऐकून चूप बसला. त्यानंतर तो काहीच बोलला नाही. तिही काहीच बोलली नाही. मात्र तो तिच्यासोबत राहाणं तिच्या मनात प्रेम फुलवणारं ठरलं.

तो तिच्यासोबत राहात होता. तिही त्याचेसोबत राहात होती. मनात आता कोणताही किंतू परंतू नव्हता. ती विसरली होती त्याला फसवणं व तोही विसरला होता तिनं केलेले कर्म. दोघांचेही सूर जुळले होते.

दोघंही अगदी आनंदात होते. अशावेळी त्याला आठवलं की तुरुंगधिकारी साहेबानं त्याला भारतीय न्यायव्यवस्थेवर आधारीत पुस्तक लिहायला लावली होती. त्यामुळे की काय, तो संविधानाचा अभ्यास करु लागला होता. त्यातच तो न्यायव्यवस्था कशी असावी याची टिपणंही करीत होता.

न्यायव्यवस्था चांगली होती. परंतू ती त्याला पटत नव्हती. कारण त्याच व्यवस्थेनं त्याला तुरुंगात टाकलं होतं.

********************

प्रत्येकाला न्याय मिळवून देण्याचा अधिकार संविधानात असतो. संविधान सशक्त अशी प्रणालीची नाही तर त्या त्या संविधानात राजकीय सहिंता, संरचना, कार्यपद्धती, अधिकार, मार्गदर्शक तत्वे, नागरीकांची कर्तव्ये यांचा समावेश असतो. भारतीय संविधानही असंच आहे. हे संविधान लिहिण्याचे श्रेय डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना जाते. कारण त्यांनी अपार मेहनत करुन भारतीय संविधान लिहिलं. त्यातच थोडंसं श्रेय त्यांची पत्नी सविता आंबेडकर हिलाही जाते. तिनंही त्या काळात त्यांची

प्रकृती सांभाळली. तसंच ती ते जी तत्वं मांडत होते संसदेत, त्यावर आपलं मतही सांगत होती बाबासाहेबांना. हे विसरता येत नाही.

भारतीय संविधान हे २६ नोव्हेंबर १९४९ ला बनले व ते २६ जानेवारी १९५० ला लागू झाले. ते सव्वीस जानेवारीला लागू झाले, म्हणून तो दिवस प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा केला जातो.

या संविधानाची रचना अशी की या संविधानानुसार शासन एका माणसाच्या हाती केंद्रीत नाही. पुर्वी या राज्याचा कारभार एकाच व्यक्तीच्या हाती कार्यान्वीत होता. राजा हाच कायदा करीत होता. तोच कायदा राबवत होता आणि त्याची अंमलबजावणी न झाल्यास तोच न्यायदान करीत होता. परंतू आता संविधानानुसार कायदेमंडळ वेगळं आहे. कार्यकारीमंडळ वेगळं आहे आणि न्यायमंडळही वेगळंच आहे. कायद्याला सर्व संसदेतील लोकसभेत निवडून आलेले प्रतिनिधी, राज्यसभेत निवडून आलेले प्रतिनिधी व शेवटी राष्ट्रपती. यांच्या नजरेखालून जावं लागतं. त्यानंतर त्याची अंमलबजावणी पंतप्रधान व त्याचं कॅबीनेट मंडळ करीत असतं व एखाद्या नागरीकांच्या हातून एखाद्या विषयावर चूक झालीच तर न्यायमंडळ वेगळं असतं. त्यानुसार ज्याचेवर अन्याय झाला. त्याला न्यायालयात दाद मांगता येते.

पुर्वीची पद्धत म्हणजे कायदा एकाच व्यक्तीच्या हाती असल्यानं व्यक्तीवर एखाद्या वेळी अन्याय झाल्यास तो अन्याय ऐकून घेण्याची पद्धत नव्हती. त्यावर योग्य असा न्यायही मिळत नसे. राजा हाच सर्वात मोठा न्यायाधीश होता. तो थेट त्याच्या मनाला वाटेल तर तो मृत्यूदंड ठोठावीत असे. ती हुकूमशाहीच होती एकप्रकारची. परंतू त्या काळात राजा हाच सर्वोच्च शासक असल्यानं राज्यात गुन्हे जास्त घडत असत. तसं आज नाही. आज प्रत्येक व्यक्तीला अन्याय झाल्यास दाद मागण्याचा अधिकार असल्यानं गुन्हेगार हा निर्भयी झाला आहे. त्याला माहीत आहे की मी गुन्हा केलाही, तरी मला काही शिक्षा होणार नाही. मी माझ्याजवळ असलेल्या पैशानं मोठ्यात मोठा वकील उभा करुन व साक्षीदारांना विकत घेवून व साक्षीदाराचे मन पालटवून स्वतः न्यायालयीन कचाट्यातून मुक्त होवू शकतो. अशीच काहीशी परिस्थिती आहे आज. आज राजाही बदलवता येत असतो आपल्याला. तोही काही शाश्वत नसतो.

आपल्याला घटनादुरुस्ती करता येते. एखादा कायदा काळानुसार नको असेल तर... कारण आपली राज्यघटना ही परीवर्तनशील आहे. परीदृढ नाही, जी अमेरीकेची आहे. तशीच एकदम जास्तही परीवर्तनीय नाही. आतापर्यंत आपण एकुण १०५ वेळाच घटनादुरुस्ती केलेली असून शेवटची

घटनादुरुस्ती १५ ऑगष्ट २०२१ ला केलेली आहे. संविधानसभेचे २८४ सदस्य कायदे बनवतांना त्यांचं मतदान घेतलं जातं.

भारतीय संविधानानुसार देशात एखाद्या वेळी आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाल्यास त्या ठिकाणी आणीबाणी लावता येते. तेथे राष्ट्रपती शासन असतं. तसेच देशात कारभार चालविण्यासाठी देशातील एकुण भुभागाचे सीमेनुसार व सरहद्दीनुसार काही भाग पाडले आहेत. त्या त्या भागाचा कारभार पाहण्यासाठी वेगळी व्यवस्था निर्माण केली आहे. तेथील कारभार पाहण्यासाठी मुख्यमंत्री व राज्यपाल असतो. तेथेही न्यायपालिका असते. तसेच तेथेही मुख्यमंत्र्यांचं कॅबिनेट मंडळ असतं. एकंदरीत सांगायचं झाल्यास भारतीय घटनेनुसार देशाला स्थैर्य प्राप्त झालं आहे.

भारतीय संविधानानुसार देशातील विवीध भागात कोणालाही आता जागा विकत घेता येते. कोणाला कुठेही राहता येते. मग तो कोणत्याही प्रदेशाचा असो, त्याची भाषा कोणतीही असो, त्याचा पोशाख कोणताही असो, एवढंच नाही तर जात, धर्म, पंथ कोणताही असो. पर्यायानं सांगायचं झाल्यास इथं भाषेनुसार, पोशाखानुसार, जातीनुसार, पंथानुसार व धर्मानुसार कोणताही भेद केलेला नाही. आज भारतातीलच नाही तर विदेशातीलही व्यक्ती कोणत्याही भागात राहू शकतो. विदेशातील लोकं जर सोडले तर

भारतातील लोकांना कुठेही राहण्यासाठी वा निवास करण्यासाठी बंधन नाही. बंधन एकच आहे, ते म्हणजे त्यानं शांततेनं राहावं. कोणतेही गुन्हे करु नये. विदेशातील लोकांना व्हिसा लागतो.

महत्वाचं सांगायचं म्हणजे भारतीय संविधान हे सशक्त आहे. चांगलं आहे. परंतू त्यात एकच दोष आहे. त्याला दोष म्हणता येणार नाही. तो दोष म्हणजे येथील न्यायपालिकेनुसार लागणारा खटल्याचा विलंब. शिवाय या देशातील संविधानात ही ताकद आजच्या घडीला दिसत नाही की जी ताकद गुन्हेगारी थांबवेल. आज गुन्हा करणारा घटक हा सशक्त असून तो पैशाच्या जोरावर मोठ्यात मोठा वकील लावून गुन्हा त्यानं केलेला असेल तर आपल्यावर कसा कलंक लावला गेला हे सिद्ध करतो. त्यानुसार वकीलांचेही दर ठरलेले आहेत. सरकारी वकील सशक्ततेनं लढत नाही. कधीकधी तो विकला जात असतो. त्यातच तारीख वार तारीख करीत खटल्याला विलंब लागतो. न्याय मिळत नाही. यामध्ये जर सरकारी वकील हुशार असेल तर न्याय मिळतो आणि तो हुशार नसेल आणि प्रतिपक्ष वकीलावर भारी पडत नसेल तर त्याला न्याय मिळत नाही.

आजचा काळ पाहता केवळ प्रतिपक्ष वकीलांच्या बचावपक्षाला वाचविण्याच्या भुमिकेमुळे भारतीय संविधानावर ताशेरे ओढले जात आहे. आज न्यायीक दृष्टीकोणातून विचार केल्यास गरीबांचा कोणीच वाली

उरलेला नाही. तसं चित्र अगदी स्पष्ट दिसत आहे. कारण समजा एखाद्या गरीबावर जर अन्याय झाला तर ती केस सर्रासपणे दाबली जाते. सर्वात प्रथम तिथंच दाबली जाते, जिथून सुरुवात होते. सुरुवात ही पोलीस स्टेशनपासून होते.

राजकीय सहभाग व पैैशाच्या माध्यमातून काही गरीबांवर झालेले अन्याय व अन्यायकारक प्रकरणं हे खालच्या स्तरावर दडपली जातात. यापैकी एखादं प्रकरण समजा न्यायालयात गेलंच तर ते वकीलांच्या माध्यमातून दाबली जातात. त्यात तारीख वार तारीख करीत करीत जसा खटल्याला विलंब लागतो. तसा जाण्यायेण्याच्या चिंतेनं व जाण्यायेण्याला पैसा लागत असल्यानं गरीब व्यक्ती चिंताग्रस्त होतो व तो खटल्यावर हजेरी दाखवत नाही. कारण तो व्यक्ती दिवसभर जेव्हा कामाला जात असतो. तेव्हाच त्याच्या घरची चूल पेटत असते. यातूनच ती केस अपयशी ठरते व तो गरीब व्यक्ती खटला हारतो.

भारतीय संविधान याच ठिकाणी हारते. याच ठिकाणी हत्या होते त्याची. यावर एकच उपाय आहे जर संविधानाला सशक्त बनवायचं असेल तर... तो उपाय म्हणजे न्याय आपल्या दारी. न्याय आपल्या दारी याचा अर्थ ज्याचेवर अन्याय झाला. ज्या ठिकाणी अन्याय झाला. त्या ठिकाणी न्यायमंडळानं जावं. त्याठिकाणी न्यायमंडळ न्यावं. चौकशी करावी व ज्या

ठिकाणी गुन्हा घडला, तिथंच आरोपीला सर्वांसमक्ष दंडीत करावे वा दंड करावे. जेणेकरुन त्या अपमानानं तरी गुन्हेगार गुन्हे करणार नाही व गुन्ह्यांची संख्या वाढणार नाही. संविधानही सशक्त बनेल व संविधानावर कोणीही ताशेरे ओढणार नाहीत. हे तेवढंच खरं आहे.

*******************

देवांशू हयात नव्हता. परंतू आज तो एक प्रसिद्ध लेखक बनला होता. कारण तुरुंगधिकारी साहेबानं म्हटल्यानुसार त्यानं पुस्तक लिहीलं होतं. तसा त्यानं विचार मांडला होता आपल्या पुस्तकातून. ते संविधानाचे विचार होते. संविधान सशक्त नाही असं त्याला वाटत नव्हतं. तसा त्याला तुरुंगवासही झाला असला तरी तो त्या संविधानाला सशक्तच मानत होता. काहीशे संविधान जिथं कमजोर होते, त्यासाठी त्यानं आपल्या पुस्तकातून विचारही मांडला होता. ते विचार म्हणजे न्याय आपल्या दारी.

आज गरीब असो की श्रीमंत. सर्वांसाठी न्याय सारखाच होता. सर्वांना न्याय समान होता. तसंच आता न्यायालय लोकांच्या दारी आलं होतं. न्यायदान सशक्तपणे होत होतं. प्रश्न सुटले होते.

ती राजनीतिक पुस्तक. पुस्तक चांगली होती. त्यापुर्वीही त्यानं बऱ्याच पुस्तका लिहिल्या होत्या. त्यातच त्याचे बऱ्याच वर्तमानपत्रात नावंही येत होतं.

ती राजनितीक पुस्तक अतिशय चांगली अशी पुस्तक होती. त्यातच त्या पुस्तकाच्या माध्यमातून क्रांती झाली होती त्यानं ती क्रांती घडवून आणली होती. ती पुस्तक बरीच गाजली होती. कारण त्या पुस्तकानं संपुर्ण देशातील न्यायव्यवस्थाच बदलून टाकली होती. परंतू ते कार्य त्याच्या मरणोपरांत घडलं होतं.

त्याच्या हयातीतच ती पुस्तक प्रसिद्ध झाली होती. त्याचबरोबर लोकं म्हणत होते की या पुस्तकाला पुरस्कार मिळायला हवा. तसा प्रस्ताव त्यानं पाठवावा. परंतू तो प्रस्ताव पाठवू शकत नव्हता. कारण त्याच्यावरील त्याची केस संपली नव्हती. मोनिकानं त्याला अगदी पतंगीच्या धाग्यासारखं अडकवून ठेवलं होतं. पतंगीचा धागा पक्ष्याच्या पायात अडकतो. त्यानंतर तो काढता न आल्यानं पक्षी जसे उपासानं मरतात. तशी त्याचीही अवस्था झाली होती. तो तीळ तीळ मरत होता.

आपण पुरस्कार मिळवू शकत नाही याचं शल्य त्याच्या मनात होतं. एवढ्यात एक फोन त्याला आला. तो फोनवरील व्यक्ती म्हणत होता,

"आम्ही एक स्पर्धा घेतली आहे. आपणाकडं त्या स्पर्धेचं परीक्षण देण्याचा विचार आहे. आपण परीक्षण कराल का?"

ते परीक्षणाचं कार्य. तसा तो म्हणाला,

"नको परीक्षण. मला काही जमणार नाही. मी काही पाहिजे तेवढा मोठा नाही." ते त्यानं उदार मतानं कबूल केलं. तसा तो फोनवरील व्यक्ती म्हणाला,

"आम्हाला माहीत आहे की आपण किती मोठे आहात ते. आपण परीक्षण करावं म्हणजे करावं. आपण मोठे आहात आमच्यासाठी. इतरांसाठी नसले तरी."

तो फोन. त्यातच देवांशूला फारच आनंद वाटत होता. त्याला परीक्षक बनविल्यानं ते परीक्षक पण त्याला सरकारच्या पुरस्कारापेक्षा मोठं वाटत होतं. कारण आतापर्यंत त्याला कोणत्याही लेखावर वा पुस्तकावर कोणताही पुरस्कार मिळाला नव्हता. तरीही थेट त्या माणसानं त्याला परीक्षक बनवलं होतं.

तो पुरस्काराचा काळच होता. त्या काळात पुरस्काराला महत्व नव्हतं. महत्व होतं ते पैशाला. कारण लोकं पैसे भरुन पुरस्कार मिळवीत होते.

त्यातच तो तसा पुरस्कार मिळताच लोकं त्याची बातमी तयार करीत. ती वर्तमानपत्रात छापत असत आणि अभिनंदनाचा वर्षावही झेलत असत.

आज असाच तो काळ. लोकांजवळ पुरस्कार मिळविण्यालायक काहीच नसायचं. तरीही त्यांना पुरस्कार मिळायचे.

दररोज अशा बातम्या वर्तमानपत्रात वाचायला मिळायच्या. त्या बातम्या वाचून वैषमता वाटायची देवांशूला. कारण देवांशूजवळ सर्वकाही होतं पुरस्कार मिळविण्यालायक. परंतू तो पुरस्कार मिळवू शकत नव्हता.

देवांशू गरीब नव्हता. तो पैशानं पाहिजे त्या प्रमाणात श्रीमंतही नव्हता. परंतू त्याला असं पैशानं पुरस्कार मिळवणं आवडत नव्हतं. मात्र जेव्हा अशा पुरस्काराच्या बातम्या वर्तानपत्रात छापून येत. तेव्हा मात्र तो अगदी निराश होत असे.

देवांशूजवळ उमेद होती. तो जास्त शिकलेलाही नव्हता. परंतू त्या उमेदीच्या जोरावर त्यानं पुरस्कार मिळविण्यालायक अशा गोष्टी मिळविल्या होत्या. परंतू त्याला पैशानं पुरस्कार मिळविणं आवडत नसल्यानं तो असा कोणताही पुरस्कार मिळवीत नव्हता वा वर्तमानपत्रातील आवेदनाच्या कोणत्याच बातम्यांना तो भाव देत नसे की ज्या बातम्यातून अमूक अमूक

पुरस्कारासाठी आवेदन करा. असं लिहून यायचं. परंतू तो आवेदन कोणत्याही पुरस्कारासाठी पाठवीत नसे.

ती मोनिकाची केस. त्या केसनं तो पार थकला होता. तो लिहीत होता लेखन. परंतू तो सुखी नव्हता. उभी हयात निघून गेली होती त्याची त्या केसमध्ये.

आज तो पुरस्कारासाठी तडपत होता. त्यानं चांगलं चांगलं साहित्य निर्माण केलं होतं. ज्या साहित्याचा अभ्यासक्रमात समावेश नव्हता. अभ्यासक्रमातही समावेश करण्यासाठी वशिलतेबाजी हवी होती. परंतू ते साहित्य वाचनीय होतं. सान थोर मंडळी ते साहित्य वाचून बोध घेत होते.

देवांशूवर मोनिकाचा खटला सुरुच होता. अशातच अल्पावधीतच त्याला काळानं कवटाळलं होतं. त्याच्या मृत्यूनंतर त्याच्यावरील खटलाही खारीज झाला होता. त्यातच त्याच्या मृत्यूनंतर त्याचं साहित्य अभ्यासलं गेलं व सरकारनं त्याला मोठा पुरस्कार दिला. तसंच त्याचं साहित्यही अभ्यासक्रमाला लावलं. एवढंच नाही तर त्याच्या पुस्तकालाही मरणोपरांत पुरस्कार मिळाला.

देवांशूनं उभी हयात साहित्यलेखनात घालवली होती. पुरस्कारासाठी तो आस बाळगून होता. अति तडपत होता तो. परंतू त्याला त्याच्या

जीवंतपणी पुरस्कार मिळाला नव्हता. तो पुरस्कार त्याच्या जीवंतपणी त्याच्यापासून दूर दूर जात होता. आज त्याला तो मिळाला. परंतू ते पाहायला तो जीवंत नव्हता.

देवांशूला पुरस्कार जाहीर झाला होता. त्यातच तो पुरस्कार जाहीर होताच तो पुरस्कार रियाला मिळाला. कधी कधी ती रिया त्या पुरस्काराकडे पाहात असे. तिला तो पुरस्कार पाहताक्षणी त्याची आठवण येत असे. वाटत असे की तो अजूनही जीवंत आहे.

देवांशू आज जीवंत नव्हता. परंतू त्याच्या आठवणी त्या पुस्तक रुपाने जीवंत होत्या आणि तोही पुस्तक रुपाने जीवंत होता. त्यानं रियाच्या हृदयात घर केलं होतं. रियाला आठवत होत्या त्या आठवणी. तिनं त्याची बरेचदा केस बंद करण्याचा प्रयत्न केला. तरीही ती केस बंद झाली नव्हती. परंतू त्या पुस्तकाचा परिणाम की काय, त्याच्या मरणोपरांत न्यायालय दारी आल्यानं व चौकशी झाल्यानं ती केस आपोआपच बंद झाली होती.

आज ती केस पाहता रियाला आठवण येत होती त्याची. वाटत होतं की तो त्या केसच्या टेन्शनच मरण पावला असावा. रियाला आठवत होत्या त्या तिच्या विवाहाच्या आठवणी. देवांशूनं तिच्याशी विवाहच केला

नव्हता तर त्यानं तिला आधारही दिला होता. तो विवाहाचा प्रसंग. तिनं देवांशूला म्हटलं होतं की देवांशू माझ्याशी विवाह कर. त्यावर तो म्हणाला,

"नाही, सध्या माझा खटला सुरु आहे न्यायालयात. कसा करणार मी विवाह? हं , खटला तुटला की करेल विवाह मी तुझ्याशी."

"पण मला तुझ्यासोबत राहायचं आहे तर."

"राहू शकतेस."

"विना विवाहानं?"

"होय, राहावंच लागेल."

"का बरं?"

"अगं शेवटच्या समयी ती नाही मानली तर. तर मला विवाह करावा लागेल की नाही तिच्याशी."

"आणि मी?"

"तुलाही ठेवणार ना. तू कुठं जाशील?"

"तिनं ठेवू नको म्हटलं तर."

"मी म्हणेल तिला की तुला माझ्यासोबत राहायचं असेल आणि विवाह करायचाच असेल तर हे सगळं सहन करावंच लागेल. त्यात रियाही."

"नाही, मला असं राहाणं सहन होत नाही."

"मग ठीक आहे, आपण गंधर्व विवाह करुया."

"गंधर्व विवाह म्हणजे?"

"लपून चोरुन केलेला विवाह. ज्यामध्ये देवच साक्षी असेल."

"म्हणजे मंदीरातील विवाह का?"

"होय, तसंच समज." तो म्हणाला.

रियाला सगळं आठवत होतं. तिनं चूक केली होती, तरी त्यानं माफ केलं होतं तिला. तिनंही समजदारीची भुमिका दाखवली होती. बरेच दिवस त्याचेसोबत राहिली होती. परंतू विशेषकरुन विवाहाचा हट्ट धरला नाही. अन् आज विवाह केला तर तो फार काळ सोबतीला राहिला नाही. विवाहानंतर अगदी दोन वर्षातच तो मृत्यू पावला होता.

आज रिया गरोदर होती. तिच्या पोटात देवांशूचं बाळ होतं. परंतू ते बाळ पाहायला देवांशू नव्हताच धरणीवर. तो केव्हाच या भुतलावरुन निघून गेला होता.

आज तिला ते बाळ झालं होतं. त्या बाळाचा नामकरण विधी होता. नामकरण विधी. काय नाव ठेवायचं असा प्रश्न पडला तिला. तसा प्रश्न पडताच तिला आठवलं, देवांशूनं म्हटलं होतं की बाळाचं नाव काय ठेवू.

त्यावर ती म्हणाली होती की देवांशू. तसा तो हसला, म्हणाला की देवांशू कसं नाव ठेवणार. देवांशू तर मीच आहे. त्यावर एकच हास्यकल्लोळ माजला होता. कदाचीत देवांशूला वाटत असेल की एकाच घरी दोन नावं नसावीत. म्हणून तर तो कदाचीत निघून गेला असेल या धरणीवरुन. तिचं ते मत. शेवटी तो नामकरण सोहळा आटोपला व त्या नामकरण सोहळ्यात तिनं आपल्या बाळाचं नाव ठेवलं देवांशू.

स्वतःच्या पतीचं नाव देवांशू आणि मुलाचंही देवांशू. ती गोष्ट संभ्रम निर्माण करणारी होती. काही लोकं चिडवीत होते तिला. परंतू तिला त्याचं काहीच वाटत नव्हतं. उलट तिला गर्व वाटायचा की तिनं आपल्या मुलाचं नाव देवांशू ठेवलंय.

क्षमोक्षणीच्या देवांशूच्या आठवणीचे प्रसंग रियाला बेचैन करीत होते. कधीकधी तिचा जीव कासावीस होत होता. त्यातच तिला जगावंसं वाटत नव्हतं. आपल्या पतीविना. आता तिच्या लेकराच्या आगमनानं एक जबाबदारी आली होती तिच्या खांद्यावर. आज ती जबाबदारी पेलतांना कस लागत होता.

एकदाचा तो प्रसंग. रियाला आठवत होता तो प्रसंग. एकदा देवांशू व्याख्यानाला गेला होता. महाविद्यालयात विद्यार्थ्यांसमोर व्याख्यान द्यायचं

होतं. त्यावेळचा तो प्रसंग. तो व्याख्यान देत होता. व्याख्यानाचा विषय होता. युवावर्गानं कसं वागावं. देवांशू सांगत होता,

"मुलांनो, तुम्ही आहात तिथं राहू नका. बाहेर पडा. विस्तारीत व्हा. बाहेरची शुद्ध हवा घ्या. अशुद्ध नको. ज्याप्रमाणे ऑक्सीजन हा वायू प्राण वाचवतो. परंतू त्यात जर बाहेरचे विषारी वायू मिसळले तर तोच ऑक्सीजन जीवघेणा ठरतो. तसं तुमचं जीवन ठेवा. कारण माणूस मग त्या वायूंमुळं आजारी पडतो व पुढं त्याला मृत्यू संभवतो.

मायबापानं तुम्हाला जन्माला घातलंय. कशासाठी तर माझा मुलगा लहानाचा मोठा होईल. आमचा आधारस्तंभ बनेल. आम्हाला पोषेल. त्यासाठीच ते शिकवतात. अन् तसं शिक्षण शिकविण्यासाठी ते काबाडकष्ट करतात. एक दिवसही घरी राहात नाही वाा कसलीही उसंत सुद्धा ते घेत नाहीत. परंतू आपण काय करतो. आपण मजा करतो, मजा मारतो. आपल्याला किंमत नसते आपल्या आईवडीलांच्या मेहनतीची. आपल्याला त्यांच्या कष्टाची किमया माहीत नसल्यासारखेच वागत असतो आपण.

बाहेर पाऊल टाका. परंतू हवेचा अंदाज घ्या. हवा थंड आहे की उष्ण. ती महाविद्यालयातील हवा शुद्ध आहे की अशुद्ध. हेही पडताळून पाहा

तुम्ही. त्यानंतरच त्यानुसार वागायला शिका. कारण अलीकडे महाविद्यालयीन हवा उष्ण आहे.

तुम्ही महाविद्यालयात गेल्यावर बिघडू नये असं वाटंतय तुमच्या मायबापाला. समजा तुम्ही बिघडले तर त्यात त्या मायबापाचं नुकसान नाही. नुकसान आहे तुमचं. तुमचं अस्तित्व नष्ट होईल. तुम्हीही नष्ट व्हाल. मायबापांना तेच वाटतं की तुमचं अस्तित्व टिकावं. ते नष्ट होवू नये. म्हणून ते सांगतात. चांगले सांगतात. जरा ऐका व त्याचं अनुकरण करा.

आज बाहेरचं वातावरण अशुद्ध आहे. ज्याप्रमाणे हवेमध्ये सल्फर डाय ऑक्साईड, हायड्रोजन सल्फाईड, कार्बन मोनोक्साईड मिसळून हवा अशुद्ध होते. तशीच कॉलेजातील हवाही अशुद्ध होते. त्यात गांजा विकणारे, बलत्कारीतेचे विचार करणारे, सिगारेट फुकणाऱ्यांचे विचार मिसळले तर...एकंदरीत सांगायचं झाल्यास कॉलेजात गुन्हेगारीच्या वातावरणाची हवा मिसळते व कॉलेजातील वातावरण गढूळ होतं. ही महाविद्यालयातील हवा खराब असते. या हवेचा अंदाज नसतो कॉलेजात नवीन पाऊल ठेवणाऱ्या तुम्हा लेकरांना. म्हणूनच तुमच्यासारखी, नवीन पाऊल ठेवणारी, तुमच्यासारखी लेकरं बिघडतात व आपल्या अख्ख्या जीवनाची राखरांगोळी करुन बसतात. त्यांना मायबापाचे कष्ट लक्षात येत नाहीत. ते लक्षात ठेवत नाहीत. विचार करीत नाहीत की आपला बाप यासाठीच

मालकांचे बोलणे ऐकतो काय? मालकाचे असुरी वागणे सहन करतो. माहीत आहे, तुम्हाला वाढविण्यासाठी कामाला जाणारे तुमचे मायबाप किती सहन करतात आपल्या मालकांचं बोलणं. काही काही मालक तर मारतात अक्षरशः तुमच्या मायबापाला आणि ते तुमचे मायबाप अक्षरश: मार खातात मालकांचा. कोणासाठी? तुमच्यासाठीच ना.

आपले मायबाप आपल्यासाठी फार मेहनत करुन आपल्याला शिकवतात. लहानाचं मोठं करतात. आपलं करीअर बनवतात. कशासाठी? आपल्याला त्रास होवू नये म्हणून. बदल्यात आपण काय देतो आपल्या मायबापाला. तर याचं उत्तर काहीच नाही असं आहे. प्रसंगी आपण आपल्या मायबापाला उपासातापासात ठेवतो.

का? मायबापानं केवळ आपल्यासाठीच राबावं काय? काय मायबापानं आपल्यासाठीच कष्टावं काय? आपण काहीच करु शकत नाही का त्यांच्यासाठी?

आपणही करु शकतो त्याच्यासाठी. भरपूर करु शकतो. परंतू आपण करु इच्छित नाही. खरं तर आपलं त्यांच्यासाठी चांगलं वागणं म्हणजे त्यांच्यासाठी चांगलं करणं होय. ते आपण करायला हवं आणि ते आपण करुही शकतो.

मुलं मायबापाचं ऐकत नाही व विपरीत करुन बसतात याचं एक उदाहरण देतो. एक मुलगी सीएचं ट्रेनिंग करीत होती. त्यातच तिचं प्रेम झालं एका मुलाबरोबर. त्यानंतर ती गरोदर राहिली.

ती गरोदर राहिली तशी मायबापाला चिंता पडली की आता काय करावं. शेवटी ती शिकत असतांनाच तिचा विवाह करुन दिला. मुलगी त्यानंतर संसारात पडली.

मुलगी संसारात पडली खरी. परंतू ते वय लहान असल्याने ती मुलगी संसारात रमली नाही. तोही रमला नाही. दोघांची ताटातूट झाली. दोघंही वेगळे झाले. परंतू दोघंही वेगळे होईपर्यंत ती प्रसूत झाली होती. आता ती शिकू शकत नव्हती. कारण तिच्यावर बाळ सांभाळण्याची जबाबदारी आली होती.

आज तसंच होत आहे प्रत्येक महाविद्यालयात. मुली मुलं प्रेम करतात आणि अल्प वयात विवाह करतात. मग तो मुलगा तिला सोडून जातो. विवाहानंतर जबाबदारी पेलवता येत नाही. कारण जबाबदारी साधी सरळ व सोपी गोष्ट नाही ना. काही मुलं विवाह करतात. काही सोडून जातात चक्कं. अशावेळी शेवटी ती गरोदर असल्यास त्याचे परिणाम कोणाला भोगावे लागतात? तर त्याचे उत्तर आहे तिलाच भोगावे लागतात. तो मात्र

मोकळा. म्हणून सांगावेसे वाटते की तुम्ही दहावी पास नक्की व्हा. पास झाल्यावर तुम्हाला महाविद्यालयात प्रवेश मिळणार. नवनवे मित्र मिळणार. तुम्ही मग मैत्री करणार. त्या मैत्रीचा विश्वास करणार. मग फसणार. परंतू फसण्याच्या अगोदर तुम्ही तेवढा कोणावर विश्वास करु नका. कारण अलीकडलं जग हे स्वार्थी आहे. फसवणूक करणारं आहे. ते फसवणूक करतं सावरण्याच्या पुर्वी. म्हणून सावध व्हा. सावधानता बाळगा. त्यातच तुमचं भलं आहे. तुम्ही दहावी पास नक्की व्हा. महाविद्यालयात जा. परंतू प्रेम करु नका कोणावर. कारण महाविद्यालयीन प्रेम हे खरं प्रेम नसतं. ते आंधळं प्रेम असतं. त्यामुळं असं आंधळं प्रेम काही आपल्या कामाचं नाही. तसं प्रेम कोणीही करु नये म्हणजे तुम्ही सुरक्षीत राहाल. तसेच कधीच फसणार नाही. कोणीच तुम्हाला फसवणार नाही व तुमची कोणीही फसवणूक करणार नाही." तिला सगळं ते आठवत होतं.

**********************

उन्हाळ्याचे दिवस सुरु झाले होते. सारखा अंगात उकाडा होता. त्यातच सुर्य मावळतीवर गेला होता. तशी ती अंगणात बसली होती. तिला

देवांशू आठवत होता. अशातच सुर्य मावळला आणि तो मावळताच तिला दिसला तो तारा. जो तुटत होता. त्या ताऱ्यानं तिला त्याचं अस्तित्व दाखवलं होतं.

तारा काही वेळानं दिसेनासा झाला. तसा विचार आला त्याचा. तोही गेला आहे पलीकडे ताऱ्यांसारखा. त्याचं अस्तित्व संपलंय. आता विसरावं लागेल त्याला.

तो तारा दिसायचा नाही. तशी रात्र व्हायची. ती तशा रात्री विचार करायची त्याला विसरण्याचा. तशी ती त्याला आता आठवत नव्हती. ती आता कामाला लागली होती. सुखानं जीवन जगत होती. कधी काळी जेव्हा तिला तो आठवायचा. तेव्हा ती आपल्या लेकराला कवेत घ्यायची. ओक्साबोक्सी रडायची. तेव्हा ते लहानगं बाळ विचारायचं,

"काय झालं गं मम्मी." तेव्हा ती अश्रू पुसायची व म्हणायची.

"काही नाही रे बाळा." त्यातच पुन्हा त्याला कवेत घेवून अंगाई गात ती झोपी जायची. मग स्वप्नात तो ताराही यायचा आणि तोही. परंतू तोही क्षणार्धात अंतर्धान पावायचा ताऱ्यासारखा. त्यावेळी झोप उघडलेली असायची. सकाळ झालेली असायची आणि कामासाठी उठावे लागायचे. कारण तिच्यावर दुसऱ्या देवांशूची जबाबदारी होती. ज्याला पुरस्कार

मिळाला होता मरणोपरांत. तसा त्यानं तिलाही पुरस्कार दिला होता तिच्या मुलाच्या रुपात. त्या मुलाला ती आपला मुलगा म्हणून वाढवत नव्हती तर देवांशू म्हणून वाढवत होती. ज्याची आठवण तिच्या हृदयात होती. तिनं त्याला विसरण्याचा प्रयत्न जरी केला असला तरी तो कधीकधी तिच्या स्वप्नात यायचा व हळूच तिला स्पर्श करुन निघून जायचा. जे तिला कधीकधी कळायचं देखील नाही.

आज रियाला आपली चूक कळली होती. तशी ती त्याची आठवण विसरलीच होती. अशातच संक्रात आली. सर्व स्रिया हळदीकूंकूचा कार्यक्रम करीत होते. तसा तिला तो प्रसंग आठवला.

तो प्रसंग...ती त्यांची पहिलीच संक्रात होती. रिया हळदीकूंकू करणार होती. परंतू कोणत्याही कार्यक्रमाला न मानणारा व त्याला अंधश्रद्धेची जोड देणारा देवांशू तिला म्हणाला होता की कशाला करतेय हळदीकूंकूचा कार्यक्रम. त्यावर ती म्हणाली होती की हे सुवासीनीचं लेणं आहे. यामुळं पतीला लांब आयुष्य मिळतं. परंतू त्यावर वेगवेगळे दाखले देत तो म्हणाला होता की ही अंधश्रद्धा आहे. यानं काही फरक पडत नाही कोणत्याही पुरुषांच्या आयुष्यावर. असं जर असतं तर आज कोणतेच पती असलेले पुरुष मरण पावले नसते. सर्वच पुरुष हे त्याच्या पत्नी निधनानंतर मरण पावले असते. त्यानंतर त्यानं तिला ते व्रत करु दिले नाही. परंतू आज तो

नसतांना तिला वाटत होतं की जर तिनं हळदीकूंकूचा कार्यक्रम केला असता तर कदाचीत तो जीवंत राहिला असता.

व्रत...स्रियांच्या आवडीचे तीन व्रत असतात. जे त्या आपल्या पतीसाठी करीत असताात. त्यात वटसावित्री व्रत, काजळतीज व्रत व तीळसंक्रांतीचे व्रत. काही काही स्रिया ह्या करवा चौथचे व्रतही करीत असतात. ह्या सर्व व्रताला त्या पतीच्या लांब आयुष्याचा पर्याय समजतात. परंतू तसं काहीच नाही. देवांशूनं व्रत करु दिलं नसल्यानं तो मरण पावला नव्हता. परंतू रियाच्या बाबतीत त्याचं मरण म्हणजे कावळा फांदीवर बसून फांदी मोडण्यागत प्रकार घडला होता. परंतू ती त्या व्रताला त्या अंधश्रद्धेच्या प्रकारात घोळत होती. दुजोरा देत होत.

आज तो नसल्याने तिला त्याच्या नसल्याचं दुःख जाणवत होतं. पदोपदीची त्याची तिला येणारी तिची आठवण बंद झाली होती. परंतू असा कोणता कार्यक्रम जेव्हा यायचा. तेव्हा तो तिला आठवायचा. जयाप्रमाणे एखादा भुगा फुलाभोवती घिरट्या घालतो ना. तसं तिला होवून जायचं व त्याच्या गतकाळाच्या त्याच्यासोबतच्या आठवणी तिच्या मनाभोवती घिरट्याा घालायच्या व पदोपदी सांगायच्या की तो मरण पावलेला नाही. अजूनही तो जीवंत आहे आणि अजूनही त्याचं अस्तित्व या जगात आहे.

मोनिका अजूनही जीवंत होती. ती आता म्हातारी झाली होती. त्यातच तिनं केलेल्या कृत्याचा तिला पश्चाताप होत होता. तिचे हाल बघवत नव्हते. तिलाही आता तो आठवत होता. परंतू आज तिचे हाल पाहायला तो जीवंत नव्हता. त्याचे जे तिच्यामुळं हाल झाले होते. त्याच पापाची शिक्षा ती भोगत होती. जणू शिशीरात पानगळ होते तशी. परंतू आज पश्चाताप करुन काही फायदा नव्हता. कारण ती वेळ आज निघून गेली होती.

***********समाप्त***********



## *अंकुश रा. शिंगाडे

*जन्मतारीख: ०३/०३/१९७७

*शिक्षण: एम ए, डी एड

## *प्रकाशित छापील साहित्य:

***कवितासंग्रह***

१)स्वातंत्र्याची गाणी २)आजादी के गीत(हिन्दी) ३)अश्रूंची गाणी ४) राजवाडा

***कादंबरी***

१)वेदना २)कंस ३)संघर्ष ४)चर्मयोगी

***कथासंग्रह***

१)मजेदार कथा २)चित्तथरारक ३)फोनच्या करामती ४)हरवलेलं बालपण ५)स्मशानाची राख ६)निकाल ७)अजून किती ८)निराशा

***लेखसंग्रह***

१)माझे शिकविण्याचे प्रयोग २)गतकाळातील शास्रज्ञ आणि शोध ३)अस्तित्व ४)अस्तित्वाची पाऊलवाट शोधतांना

***चारोळीसंग्रह***

१)आक्रमण

***प्रवासवर्णन***


१)प्रवास २)प्रवासातील गमतीजमती

*महाराष्ट्रात वेगवेगळ्या वृत्तपत्रातून साहित्य लेखन*

**अंकुश शिंगाडे**
**यांची ई साहित्यवर उपलब्ध ईपुस्तके**
**ज्या कव्हरवर एक क्लिक कराल ते पुस्तक उघडेल.**












अंकुश शिंगाडे


यांची ई साहित्यवर उपलब्ध ईपुस्तके

ज्या कव्हरवर एक क्लिक कराल ते पुस्तक उघडेल.
















http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/bappa_rawa
df





























अंकुश शिंगाडे
भुताटकी



रा जा दा हि र
अंकुश शिंगाडे


अंकुश शिंगाडे
घटस्फोट



अंकुश शिंगाडे
महाराणी संयोगीता आणि पृथ्वीराज


अंकुश शिंगाडे
मा र्ग अर्जूनचा


अंकुश शिंगाडे
लेखक


अंकुश शिंगाडे
लिखीत
गोविंद गोपाळ गायकवाड
कादंबरी


अ स्ति त्व
अंकुश शिंगाडे


अंकुश शिंगाडे
कामगार

# ई साहित्य प्रतिष्ठानचे हे पंधरावे वर्ष.
# श्री अंकुश शिंगाडे यांचे ईसाहित्यवर हे तिसावे पुस्तक.
# या कादंबरीसाठी त्यांचे अभिनंदन

अंकुश शिंगाडे एक शिक्षक आहेत. शिक्षक ही त्यांची केवळ उपजीविका नाही तर जीविकाही आहे. समाजात सत्याचे आणि विज्ञानाचे ज्ञान पसरावे व समाज मनाने बळकट व्हावा, त्यातही मुलींनी शिकावे व त्यांच्या आत्मनिर्भरतेने समाजाला अधिक बळकटी यावी हे त्यांचे स्वप्न आहे. ते भरपूर लिहीतात ते समाजातील दबल्या गेलेल्या घटकांना आवाज देण्यासाठी. आपली पुस्तके समाजात जास्त वाचली जावीत असे त्यांना वाटते आणि ई साहित्य हे त्या दृष्टीने त्यांन योग्य वाटते. त्यांची आजवर २४ छापील पुस्तकेही विविध प्रकाशकांनी प्रकाशित केली आहेत व त्यांच्या पुस्तकांना मागणी आहे. पण तरीही ते आपली पुस्तके ई साहित्यच्या वाचकांना विनामूल्य देतात.

अंकुश शिंगाडे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ

मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१४), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(९), डॉ. नितीन मोरे (४७), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (९), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्रूण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (१०), डॉ. वृषाली जोशी(४३), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(३०), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(१२), जगदिश खांदेवाले(६) पंकज कोटलवार(६) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(१०), श्याम कुलकर्णी(१०), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(४), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर(२), बंकटलाल जाजू (५), प्रवीण दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्रबुद्धे (४), जयश्री

पटवर्धन(५) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, उत्कृष्ट लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली उत्तमोत्तम पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ’इ’यें ।
दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।